ગુજરાત શૈક્ષણિક સંશોધન અને તાલીમ પરિષદ, ગાંધીનગરના પત્ર–ક્રમાંક
જીસીઈઆરટી/અભ્યાસક્રમ/માધ્યમ/૨૦૧૫/૬૪૧, તા. ૯-૧-૨૦૧૫–થી મંજૂર

# मराठी

## इयत्ता ३

### ( प्रथम सत्र – द्वितीय सत्र )

**प्रतिज्ञापत्र**

भारत माझा देश आहे.
सारे भारतीय माझे बंधुभगिनी आहेत.
माझ्या देशावर माझे प्रेम आहे.
माझ्या देशातल्या समृद्ध आणि विविधतेने नटलेल्या परंपरांचा मला अभिमान आहे.
त्या परंपरांचा पाईक होण्याची पात्रता माझ्या अंगी यावी म्हणून मी
सदैव प्रयत्न करीन.
मी माझ्या पालकांचा, गुरुजनांचा आणि वडीलधाऱ्या माणसांचा मान ठेवीन
आणि प्रत्येकाशी सौजन्याने वागेन.
माझा देश आणि माझे देशबांधव यांच्याशी निष्ठा राखण्याची मी प्रतिज्ञा करतो
त्यांचे कल्याण आणि त्याची समृद्धी ह्यातच माझे सौख्य सामावलेले आहे.

**રાજ્ય સરકારની વિનામૂલ્યે યોજના હેઠળનું પુસ્તક**

विद्यार्थ्याचे नाव : ____________________

शाळेचे नाव : ____________________

इयत्ता : __________ रोल नंबर : __________

तमसोमा ज्योतिर्गमय

**गुजरात राज्य शाळा पाठ्यपुस्तक मंडळ**

'विद्यायन', सेक्टर १०-ए, गांधीनगर-३८२०१०

© गुजरात राज्य शाळा पाठ्यपुस्तक मंडळ, गांधीनगर
या पाठ्यपुस्तकाचे सर्व हक्क गुजरात राज्य शाळा पाठ्यपुस्तक मंडळाच्या स्वाधीन आहेत. या पाठ्यापुस्तकातील कोणताही भाग, कोणत्याही स्वरूपात गुजरात राज्य शाळा पाठ्यपुस्तक मंडळाच्या नियामकांच्या लेखी परवानगी शिवाय प्रकाशित करता येणार नाही.

**विषय-सल्लागार**
श्रीमती रोहिणी खांडेकर

**कन्वीनर**
श्रीमती सुदेष्णा मुरलीधर कदम

**लेखन-संपादन**
डॉ. वैभवी प्र. देहूकर
श्रीमती प्रीती श. सुधाळकर

**समीक्षा**
श्री रमेश एन. घरटे
श्रीमती दीपा आर. शिंपी
श्री शरद पाटील

**चित्रांकन**
श्री मणीलाल राजपूत

**संयोजन**
डॉ. कमलेश एन. परमार
(विषय-संयोजक : हिन्दी)

**निर्माण-आयोजन**
श्री हरेन शाह
(नायब नियामक : शैक्षणिक)

**मुद्रण-आयोजन**
श्री हरेश एस. लीम्बाचीया
(नायब नियामक : उत्पादन)

## प्रस्तावना

जी.सी.ई.आर.टी. च्या स्टेट रिसोर्स ग्रुप (SRG) द्वारा NCF-2005 आणि RTE-2009 च्या दस्तावेजांना केन्द्रस्थानी ठेवून सन् 2011 मध्ये प्राथमिक शिक्षणात इयत्ता १ ली ते ५वी ची मराठी पुस्तके भाषेत नवीन अभ्यासक्रमात निर्देश केलेल्या मुद्यांच्या आधारावर तयार केलेली आहेत. इयत्ता ३री मराठीचे हे पाठ्यपुस्तक विद्यार्थ्यांसमोर ठेवतांना मंडळास आनंद होत आहे.

राष्ट्रीय स्तरावर अभ्यासक्रमात होणारे परिवर्तन लक्षात ठेवून गुजरात राज्यात प्राथमिक स्तरावर अभ्यासक्रम (Curriculam), पाठ्यक्रम (Syllabus), पाठ्यपुस्तके (Textbooks) तसेच शिक्षण प्रक्रियेस नव्या दृष्टिकोणातून, रुप देण्यात आले आहे. विद्यार्थ्यांमध्ये सर्जनात्मकता, विचारशक्ती, तर्कशक्ती तसेच प्राप्त ज्ञानाचा उपयोग करण्याची क्षमता वाढवावी. ह्या उद्देशांना महत्त्व देण्यात आले आहे. पाठ्यपुस्तकात दिलेल्या प्रवृत्यांच्या आधारे विद्यार्थ्यांचे चर्चा, चिंतन आणि पृथ्थकरण करुन बौद्धीक स्तर वाढेल. समूहकार्यासाठी व्यक्तिगत विकास करतील असा प्रयत्न आहे. तरी पण नवीन पाठ्यक्रमाच्या आधारे तयार केलेले हे पुस्तक ध्येय नसून मात्र दिशासूचक साधन आहे.

पाठ्यपुस्तकां शिवाय विशेष माहितीसाठी आधुनिक उपकरण उपलब्ध आहेत. म्हणून शिक्षणात अभिवृद्धी झाली आहे. हे लक्षात ठेवून अध्ययन-अध्यापनाची प्रक्रिये द्वारा विद्यार्थ्यांना उत्तम नागरिक होण्याची प्रेरणा मिळेल, राष्ट्रप्रेम वाढेल आणि ते योग्य चारित्र्यसंपन्न बनतील असा प्रयत्न आहे. पाठ्यपुस्तकांच्या उपयोगाद्वारे ह्या प्रक्रियेला सरळ आणि रुचिपूर्ण करण्याचा प्रयत्न आहे.

ह्या पाठ्यपुस्तकांची गुणवत्ता सुधारण्यासाठी हे पाठ्यपुस्तक प्रसिद्ध करण्यापूर्वी त्याच्या हस्तप्रतीच्या स्तरावर शिक्षणकार्य करणाऱ्या शिक्षक आणि तज्ज्ञांद्वारे सर्वांगीण समीक्षा करण्यात आली आहे. शिक्षक तसेच तज्ज्ञांच्या सुचनेप्रमाणे हस्तप्रतीत योग्य सुधारणा केल्यानंतर हे पाठ्यपुस्तक प्रसिद्ध करण्यात आले आहे.

ह्या पाठ्यपुस्तकांची गुणवत्ता अभिवृद्धीसाठी आपण विद्वान व्यक्ती, शिक्षक, पालक आणि वाचकांच्या सूचनांचे आम्हाला महत्त्व असल्याने पाठ्यपुस्तक मंडळ आपल्या सुचनांचे स्वागत करेल.

**पी. भारती** (IAS)
नियामक
ता. 21-11-2019

**कार्यवाह प्रमुख**
गांधीनगर

**प्रथम आवृत्ती :** 2015 **पुनःमुद्रण :** 2016, 2017, 2018, 2019, 2020
**प्रकाशक :** गुजरात राज्य शाळा पाठ्यपुस्तक मंडळ, 'विद्यायन', सेक्टर 10-ए, गांधीनगर साठी पी. भारती, नियामक.
**मुद्रक :**

# मूलभूत कर्तव्ये

भारतातील प्रत्येक नागरिकाची कर्तव्ये खालीलप्रमाणे आहेत : *

(क) घटनेचे पालन करणे आणि तिचे आदर्श व संस्थाचा, राष्ट्रध्वज व राष्ट्रगीत यांचा आदर करणे;

(ख) ज्यामुळे आपल्याला राष्ट्रीय स्वातंत्र्यलढयास स्फूर्ती मिळाली त्या उदात्त आदर्शाची जोपासना करुन त्यांचे अनुकरण करणे;

(ग) भारताची सार्वभौमता, एकता व एकात्मता उन्नत राखणे व संरक्षण करणे;

(घ) आवाहन केले जाईल तेंव्हा देशाचे संरक्षण करणे व राष्ट्रीय सेवा बजावणे;

(च) धार्मिक, भाषिक व प्रादेशिक किंवा वर्गीय भेदांच्या पलीकडे जाऊन अखिल भारतीय जनतेमध्ये एकोपा व भ्रातृभाव वाढीला लावणे; स्त्रियांच्या प्रतिष्ठेला उणेपणा आणणाऱ्या प्रथा सोडून देणे;

(छ) आपल्या संमिश्र संस्कृतीच्या वारशाचे मोल जाणून तो जतन करणे;

(ज) अरण्ये, सरोवरे, नद्या व जीवसृष्टी यांसह नैसर्गिक पर्यावराचे रक्षण करणे, त्यात सुधारा करणे, आणि सजीव प्राण्यांविषयी दयाबुद्धी बाळगणे;

(झ) विज्ञाननिष्ठ दृष्टिकोण, मानवतावाद आणि शोधक बुद्धी व सुधारणावाद यांचा विकास करणे;

(ङ) सार्वजनिक संपत्तीचे रक्षण करणे वन्य हिंसाचाराचा निग्रहपूर्वक त्याग करणे;

(ट) राष्ट्र सतत पुरुषार्थ व सिद्धी यांच्या चढत्या श्रेणी गाठत जाईल अशा प्रकारे सर्व व्यक्तिगत व सामुदायिक कार्यक्षेत्रात पराकाष्ठेचे यश संपादन करण्यासाठी झटणे, हे प्रत्येक नागरिकाचे कर्तव्य आहे;

(ठ) आई-वडील किंवा पालकांनी 6 वर्ष ते 14 वर्षापर्यंत वयाच्या स्वत:च्या मुलांना किंवा पाल्यांना शिक्षणाची संधी देणे.

*भारताची घटना : कलम 51-क

# अनुक्रमणिका


| क्रम | पाठाचे नाव | लेखक | पृष्ठ संख्या |
|---|---|---|---|
| | **प्रथम सत्र** | | |
| १. | कोल्हा आणि करकोचा | संकलित | १ |
| २. | प्रार्थना | आसावरी काकडे | ५ |
| ३. | पैज | संकलित | ९ |
| | पुनरावर्तन — १ | - | १५ |
| ४. | रंगांचे भांडण | एकनाथ आव्हाड | १९ |
| ५. | एक होता बाळू | संकलित | २४ |
| ६. | चारोळी | संकलित | ३३ |
| | पुनरावर्तन — २ | - | ३६ |
| | **द्वितीय सत्र** | | |
| ७. | मुंगी आणि कबूतर | (चित्रकथा) | ४० |
| ८. | आजीचें घड्याळ | केशवकुमार | ४३ |
| ९. | चिंगीचा पराक्रम | ना.धो.ताम्हनकर | ४७ |
| १०. | आईस पत्र | संकलित | ५३ |
| | पुनरावर्तन — ३ | - | ५८ |
| ११. | पतंग | अ. ज्ञा. पुराणिक | ६० |
| १२. | श्रावणबाळ | पं. महोदवशास्त्री जोशी | ६४ |
| १३. | राणी लक्ष्मीबाई | शं. रा. देवळे | ६९ |
| १४. | उखाणे | संकलित | ७४ |
| | पुनरावर्तन — ४ | - | ७७ |
| | **पूरक वाचन** | | |
| १. | प्रकाशातले तारे तुम्ही | उमाकांत काणेकर | ७९ |
| २. | भवाई | पंढरीनाथ रेगे | ८० |
| ३. | ऋतु | संकलित | ८२ |

# १ कोल्हा आणि करकोचा

– संकलित



कोल्हा आणि करकोचा हे दोघे जिवलग मित्र होते. दोघे दररोज भेटायचे आणि गप्पागोष्टी करीत हिंडायचे.



एकदा काही कारणाने कोल्हा आनंदात होता. तेव्हा तो करकोच्याला म्हणाला, ''करकोचाभाऊ, तू उद्या माझ्याकडे जेवायला ये. मी छान जेवण बनवेन.''

करकोचा हो म्हणाला. दुसऱ्या दिवशी करकोचा खुश होऊन कोल्ह्याकडे जायला निघाला. खिरीचा गोड वास त्याला बाहेरूनच कळला. त्याला फारच भूक लागली होती.



कोल्ह्याने बनवलेली खीर एका मोठ्या थाळीत ओतली. दोघे मित्र समोरासमोर बसले. कोल्हा म्हणाला, ''चला भाऊ, खीर पोटभर खा. लाजू नका.'' थाळीतली खीर करकोच्याला आपल्या लांब चोचीने खाता येत नव्हती. तो उपाशीच राहिला. कोल्ह्याने मात्र चाटून चाटून खीर खाल्ली.

करकोचा खूप रागावला. पण काही न बोलता निघून गेला. काही दिवसांनंतर करकोच्याने कोल्ह्याला आपल्या घरी जेवायला बोलावले.

त्याने कोल्ह्याला त्याच्या लबाडीबद्दल शिक्षा करायचे ठरविले.





करकोच्यानेही खीरच बनवली. कोल्होबा आले तेव्हा करकोचा म्हणाला, ''या कोल्होबा, तुला खीर फार आवडते ना, म्हणून मी खीरच बनवली आहे.'' सगळी खीर एका लहान तोंडाच्या सुरईत ओतली दोघांच्या मध्ये ठेवली. कोल्ह्याला काही त्या सुरईतली खीर खाता आली नाही. करकोच्याने मात्र सुरईत आपली लांब चोच घालून पोटभर खीर खाल्ली. उपाशी कोल्हा मान खाली घालून निघून गेला. करकोचा मनात म्हणाला, ''कोल्होबा, कशी तुमची खोड मोडली !''

यालाच म्हणतात, 'जशास तसे.'

## शब्दार्थ

**जिवलग मित्र** खास मित्र **सुरई** लहान तोंडाचे, उभ्या आकाराचे भांडे **खोड मोडणे** एखाद्याची वाईट सवय घालवणे **जशास तसे ( म्हण )** समोरचा माणूस जसा वागेल तसेच आपणही वागणे.

## स्वाध्याय

१. **खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा :**

(१) कोल्ह्याने करकोच्याला कशासाठी बोलावले ?

(२) कोल्ह्याने जेवायला काय बनवले ?

(३) कोल्ह्याने खीर कशात ओतली ?

(४) करकोचा का उपाशी राहिला ?

(५) करकोच्याने कोल्ह्याची खोड कशी मोडली ?

२. **खाली दिलेले शब्द घेऊन वाक्ये बनवा आणि वाचा :**

(१) जिवलग : ____________________

(२) आमंत्रण : ____________________

(३) खीर : ____________________

(४) उपाशी : ____________________

३. **खाली दिलेल्या वाक्यांतील रिकाम्या जागी योग्य शब्द निवडून लिहा व पूर्ण वाक्य लिहा :**

(१) ____________ खीर थाळीत ओतली. (करकोच्याने/कोल्ह्याने)

(२) सुरईचे तोंड ____________ होते. (पसरट/लहान)

(३) करकोचा व कोल्हा एकमेकांचे ____________ होते. (मित्र/शत्रू)

(४) ते दोघे ____________ भेटत असत. (दररोज/कधीतरी)

(५) करकोच्याला फारच ____________ लागली होती. (तहान/भूक)

४. **पक्ष्यांची पाच नावे लिहा आणि प्रत्येकाविषयी एक वाक्य लिहा :**

**उदाहरण :** चिमणी – चिमणी चिवचिव करते.

५. तुमच्या आवडत्या एका जंगली प्राण्याविषयी पाच वाक्ये लिहा व त्याचे चित्र काढा :

# २ प्रार्थना

– आसावरी काकडे


उजाडते रोज आपल्याच साठी
झोप घेण्यासाठी होई रात्र

शेतात पिकते पाऊस पडतो
पक्षी गाणे गातो आनंदात

नाक घेई श्वास डोळे पाहतात
कान ऐकतात सारे काही

काही न करता कसे घडे सारे
चंद्र सूर्य तारे कुणामुळे ?

करुया प्रार्थना नम्र होण्यासाठी
मिळविण्यासाठी नवे बळ



## शब्दार्थ

**नम्र** चांगले वागणे **बळ** शक्ती, ताकद **उजाडणे** दिवस उगवणे

## स्वाध्याय

**१. खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा :**

(१) रात्र कशासाठी होते ?

(२) पक्षी आनंदाने काय गातो ?

(३) आपल्याला प्रार्थना केल्याने काय मिळते ?

**२. खालील प्रत्येक शब्दाचा उपयोग करून वाक्ये लिहा :**

(१) शेत : ____________________

(२) कान : ____________________

(३) पाऊस : ____________________

(४) चंद्र : ____________________

**३. खालील काव्यपंक्ती लिहा :**

उजाडते रोज ____________________

____________________

____________________

____________________ आनंदात

**३. खालील शब्द सुंदर अक्षरात पुन्हा लिहा :**

(१) रात्र ______ (२) श्वास ______ (३) चंद्र ______

(४) सूर्य ______ (५) प्रार्थना ______ (६) नम्र ______

## ५. खालील कोष्टकात काव्यातील शब्द शोधून ⬭ अशी खूण करा आणि ते शब्द खाली लिहा :

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| रो | ख | हो | श्वा | क | ते | र्य |
| ज | डा | म्र | स | सा | सू | त्र |
| शा | न | को | ष | झो | प | व |
| घ | डे | वे | चं | क | ठी | डो |
| क | प | ऐ | द्र | ता | त | ळे |

(१) ______ (२) ______

(३) ______ (४) ______

(५) ______ (६) ______

(७) ______ (८) ______

## ६. खालील शब्दांचे समानार्थी शब्द लिहा :

(१) रात्र = ______ (२) पक्षी = ______

(३) आनंद = ______ (४) बळ = ______

## ७. सूचनेप्रमाणे करा :

(१) 'समाजसुधारक' या शब्दपासून तयार होणारे दुसरे चार शब्द लिहा :

**उदाहरण :** समाज

(१) ______ (२) ______

(३) ______ (४) ______

(२) वरील बनविलेल्या शब्दांचा उपयोग करुन वाक्ये लिहा :

(१) ________ (२) ________

(३) ________ (४) ________

(३) नमून्याप्रमाणे शब्दजोड्या लिहा :

खेळणारा : खेळाडू

(१) लिहिणारा ________ (२) गाणारा ________

(३) शिकविणारा ________ (४) वाचणारा ________

## ८. खालील शब्दांना शब्दकोशाच्या क्रमाप्रमाणे लिहा :

नाक, पक्षी, सूर्य, कान, बळ

**प्रवृत्ती**

- पद्य चालीत म्हणवून घेणे.

✻

# ३ पैज

– संकलित



कैलास हे शिवाचे वसतिस्थान. तिथे तो आपल्या परिवारासह राहतो. त्याच्या परिवारात नंदी आहे, गण आहेत, तसेच त्याचे दोन पुत्रही आहेत. एक गणपती व दुसरा कार्तिकेय. गणपती हा बुद्धिमान आणि कार्तिकेय हा लढवय्या सेनापती. ते दोघे कैलासावर मनसोक्त विहार करीत आणि प्रसंगी विवादही करीत.

अशीच एके दिवशी त्या दोघांची स्पर्धा ठरली. पृथ्वीप्रदक्षिणा करायची. कोण आधी येतो; ते पाहायचे. मग शंकराकडून बक्षीस मिळवायचे. लगेच ते दोघे शंकराकडे गेले. त्याला म्हणाले, 'आम्ही पृथ्वीप्रदक्षिणेची स्पर्धा लावली आहे. जो जिंकील त्याला तुम्ही बक्षीस द्यायचे. काय देणार ते सांगा.'

शिव म्हणाला, 'जो जिंकील, त्याला हे माझ्या पुढ्यातले डाळिंब बक्षीस देईन.' दोघेही म्हणाले, 'ठीक आहे.'

कार्तिकेयाचे वाहन मोर. कार्तिकेय त्याच्यावर आरूढ झाला. मोर कार्तिकेयाला पाठीवर घेऊन उडत उडत पृथ्वीप्रदक्षिणेला निघाला.

पाठोपाठ गणपतीने उंदराला जवळ बोलावले. उंदीर हेच त्याचे वाहन होते. गणपती त्याच्यावर स्वार झाला. पण गणपती हा अंगाने स्थूल असल्यामुळे उंदराला त्याचा एवढा बोजा संभाळून चालता येईना. तो लडखडू लागला.

कार्तिकेयाला हे सगळे माहीत होते. तो मनोमन गणपतीची कीव करीत होता. कुठे माझा उडता मोर आणि कुठे त्याचा चूं चूं करणारा बिळातला प्राणी ! गणपतीने माझ्याशी स्पर्धा लावताना दहा वेळा विचार करायला हवा होता.

पण गणपतीने थोड्याच वेळात उंदराला सोडून दिले. एका जागी उभा राहून तो विचार करू लागला. तसे करताना त्याला एकदम एक कल्पना स्फुरली !'बस्स ! असेच करायचे. कार्तिकेयाला टाकू दे धापा !'

गणपतीने लगेच पूजासाहित्य गोळा केले आणि तो शिव-पार्वतीजवळ गेला. शिव त्याला म्हणाला, 'हे काय ? तू पृथ्वीप्रदक्षिणेला अजून निघाला नाहीस ? अरे त्या कार्तिकेयाने अर्धी पृथ्वी पालथी घातली असेल.'

'घालू दे त्याला. पण मी आधी तुम्हा उभयतांची पूजा करीन अन् मग निघेन.'

गणपतीने शिव-पार्वतींना एका उच्चासनावर शेजारी शेजारी बसवले. प्रथम त्यांचे पाय धुतले. शिवाला दुबोटी आडवे गंध लावले. पार्वतीला कुंकू वाहिले. त्यांच्या गळ्यात पुष्पहार घातले. त्यांच्या हातावर नैवेद्याचा लाडू ठेवला. मग त्या उभयतांना प्रदक्षिणा घालून साष्टांग नमस्कार घातला. मग उठून दोघांसमोर उभा राहिला.

'का रे ? कशासाठी उभा राहिला आहेस ? तुला काही हवे का ?'

'बक्षीस ! पृथ्वीप्रदक्षिणा कार्तिकेयाच्या आधी पुरी केल्याबद्दल !'

शिव खो खो हसत सुटला. मग गणपतीला म्हणाला,

'तू स्पर्धा जिंकलीस ? पाच पावले तरी चालून गेलास का ?'

'ते काहीही असो. शास्त्रवचनाप्रमाणे मी पृथ्वीप्रदक्षिणा पुरी केली आहे.'

'ती कशी ?'

'शास्त्रात सांगितले आहे, की माता म्हणजे पृथ्वी. पिता म्हणजे आकाश. मी तुम्हा दोघांची पूजा करून तुम्हाला प्रदक्षिणा घातली आहे...बाबा, एकतर शास्त्रवचन खोटे आहे असे म्हणा, नाहीतर मला बक्षीस द्या.'

त्यावर शिवाला काही बोलताच येईना. त्या दोघांनी गणपतीच्या बुद्धीचे तोंड भरून कौतुक केले आणि स्पर्धेचे डाळिंब गणपतीच्या हातावर ठेवले. गणपती ते घेऊन छाती फुगवून उभा राहिला.

एवढ्यात कार्तिकेय मोरावरून खाली उतरला. त्याची खूप दमछाक झाली होती, तरी पण त्याने पृथ्वीप्रदक्षिणा पुरी केली होती. पण जवळ येऊन पाहतो, तर बक्षिसाचे डाळिंब गणपतीच्या हातात. त्याला त्या गोष्टीचा संताप झाला. त्याने शिवाला विचारले.

'असे कसे केलेत तुम्ही ? याने माझ्या आधी प्रदक्षिणा पुरी केली ?'

'होय मुला, त्याने शास्त्रवचनाच्या आधारे तुझ्या आधी पृथ्वीप्रदक्षिणा पुरी केली. माता म्हणजे पृथ्वी...'

'तो तुमचा आवडता. त्याने काही केले, काही सांगितले तरी ते बरोबर ! मी तुमचा नावडता. आज मला पुरते कळले. माता मी इथे राहणार नाही. दूर कुठे तरी निघून जाईन आणि पुन्हा तुम्हाला तोंड दाखवणार नाही !!'

कार्तिकेय जायला निघाला. शिव-पार्वतींनी त्याला आडवले. त्याची समजूत घालण्याचा खूप प्रयत्न केला. पण कार्तिकेयाने त्यांचे काहीही ऐकले नाही. तो सुसाट निघाला. कैलास उतरून खाली आला. पुढे त्याने दक्षिण दिशा धरली. तो खूप लांबवर दक्षिणेत आला. आणि एका डोंगरावर चढला. तिथेच कायमचा विसावला.

पण दक्षिणेत त्याला खूप आदर सत्कार मिळाला. लोक त्याच्या दर्शनासाठी डोंगर चढू लागले. त्याच्या अभिषेकासाठी दुधाच्या कावडी आणू लागले. त्यांनी त्याच्यासाठी डोंगरावरच एक मंदिर उभारले. इतकेच नव्हे, तर त्याची दोन लग्ने लावून दिली.

## शब्दार्थ

**बुद्धिमान** हुशार **आरूढ होणे** चढून बसणे **कीव येणे** दया येणे **स्फुरणे** सुचणे **दमछाक होणे** थकून जाणे **आदर** मान, सन्मान **लढवय्या** लढणारा **विसावणे** विश्रांती घेणे **स्थूल ( येथे )** लठ्ठ **पृथ्वी प्रदक्षिणा** पृथ्वीच्या भोवती गोल फेरी मारणे

## स्वाध्याय

**१. खाली दिलेल्या प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे द्या :**

(१) कार्तिकेय आणि गणपती कुणाची मुलं होती ?

(२) कार्तिकेय कोणावर आरूढ झाला ?

(३) कार्तिकेय आणि गणपतीमध्ये स्पर्धा कोण जिंकलं ?

**२. खाली दिलेल्या प्रश्नांची दोन-तीन वाक्यांत उत्तरे लिहा :**

(१) गणपती आणि कार्तिकेय कैलासावर काय काय करीत असत ?

(२) गणपती आणि कार्तिकेय यांच्यात कोण बुद्धिमान होते ? कसे ?

(३) प्रदक्षिणेमध्ये कोण प्रथम आले ? कसे ?

(४) रागावून कार्तिकेयाने काय केले ?

**३. खालील विधाने कोण कोणास म्हणाले ते लिहा :**

(१) ‘‘जो जिंकील, त्याला हे माझ्या पुढ्यातले डाळिंब बक्षिस देईन’’ ______________

______________

(२) ‘‘घालू दे त्याला. पण मी आधी तुम्हा उभयतांची पूजा करीन अन् मग निघेन.’’

______________

(३) ‘‘असे कसे केलेत तुम्ही ? याने माझ्या आधी प्रदक्षिणा पुरी केली ?’’ ______________

______________

## ४. खाली दिलेली वाक्ये वाचा आणि लिहा :

(१) तसे करताना त्याला एकदम कल्पना स्फुरली !

(२) "तू स्पर्धा जिंकलीस ? पाच पावले तरी चालून गेलास का ?"

(३) त्याने काही केले, काही सांगितले तरी ते बरोबर !

(४) दूर कुठे तरी निघून जाईन आणि पुन्हा तुम्हाला तोंड दाखवणार नाही !

## ५. खालील विधानामधील चांगल्या गोष्टी समोर ☑ आणि वाईट गोष्टी समोर ☒ करा :

(१) गणपतीने आईवडीलांची पूजा केली. ☐

(२) सोनाली अभ्यास करत नाही ☐

(३) अमर पुस्तकाची पाने फाडतो. ☐

(४) संजय घरात पसारा करतो. ☐

## ६. सूचनेनुसार करा :

(१) पाठात आलेल्या नव्या शब्दांची नोंद करा.

**उदाहरण :** आकाश

(२) ज्या शब्दांची नोंद केली आहे, त्या शब्दांचे समानार्थी शब्द लिहा.

**समानार्थी शब्द :** आभाळ

(३) पाठात आलेल्या खालील शब्दांचे विरुद्धार्थी शब्द लिहा.

(१) बुद्धिमान × ________ (२) आधी × ________

(३) जिंकला × ________ (४) खोटे × ________

(४) वर आलेल्या समानार्थी आणि विरुद्धार्थी शब्दांवरून वाक्ये बनवा.

________________

________________

________________

________________

________________

## ७. खाली दिलेल्या प्रत्येक शब्दसमूहासाठी एक शब्द लिहा :

(१) सेनेचा मुख्य ________

(२) देवाच्या अथवा मंदिराच्या भोवती गोल फिरणे ________

(३) पवित्र धार्मिक स्थळाची श्रद्धेने यात्रा करणे ________

(४) सिंहाच्या आकृतीचे आसन ________

### प्रवृत्ती

- कोणत्याही एका धार्मिक स्थळाला भेट देऊन त्या स्थळाचे वर्णन पाच वाक्यांत तुमच्या शब्दात लिहा.

❋

# पुनरावर्तन १

## १. खाली दिलेल्या प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा :

(१) कोल्होबाने कोणाला आमंत्रण दिले ?

(२) पक्षी आनंदात काय करतात ?

(३) गणपतीचे वाहन काय आहे ?

## २. खाली दिलेल्या प्रश्नांची दोन वाक्यात उत्तरे लिहा :

(१) ईश्वराची प्रार्थना का करायची ?

(२) गणपती आणि कार्तिकेय या दोघांमध्ये कोणती स्पर्धा ठरली ? स्पर्धा जिंकल्यावर काय मिळणार होते ?

## ३. खाली दिलेले शब्द सुवाच्य अक्षरात लिहा :

(१) कोल्होबा ________ (२) धर्मराज ________

(३) स्पर्धा ________ (४) पश्चिम ________

(५) चंद्र ________ (६) प्रार्थना ________

(७) पृथ्वी ________ (८) कल्पना ________

## ४. सूचनेनुसार करा :

(१) भावनगर शब्दातून बनणारे शब्द लिहा.

(२) जे शब्द बनविले त्या प्रत्येक शब्दाचा उपयोग करून एक-एक वाक्य बनवा.

## ५. खाली दिलेल्या शब्दांचे समानार्थी शब्द लिहा :

(१) मित्र = ________ (२) डोळे = ________

(३) पाणी = ________ (४) आकाश = ________

## ६. खाली दिलेल्या शब्दांचे विरूद्धार्थी शब्द लिहा :

(१) खाली × ________ (२) आवडते × ________

(३) झोपणे × ________ (४) रात्र × ________

(५) अंधार × ________ (६) जिंकणे × ________

## ७. कंसात दिलेल्या प्रत्ययातून योग्य प्रत्यय निवडून रिकाम्या जागा भरा :

(चा, ची, चे, च्या)

(१) कोल्हाबा ______ एका करकोच्याशी मैत्री होती.

(२) कार्तिकेया ______ वाहन मोर आहे.

(३) त्या दोघांनी गणपती ______ बुद्धिचे तोंड भरून कौतुक केले.

(४) कार्तिकेय एका डोंगरावर चढला आणि तिथेच कायम ______ विसावला.

## ८. (१) खालील दिलेल्या लंबचौरसमध्ये पाच प्राण्यांची नावे आहेत, ती शोधून त्यांच्या भोवती ⬭ करा आणि नावे लिहा :

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| म | क | ल | सिं | ह | ग | म |
| स | ग | प | फ | त | भ | ह |
| य | क्ष | र | ह | र | ण | त्ती |
| वा | घ | क | म | भ | ल | न |

(१) ________ (२) ________ (३) ________ (४) ________

(५) ________

### (२) खालील दिलेल्या लंबचौरसमध्ये पाच वस्तूची नावे आहेत, ती शोधून त्यांच्या भोवती ⬭ करा आणि नावे लिहा :

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| का | त | र | फ | व | ता | ख |
| स | ल | ह | टे | भ | ट | म |
| य | ड | ल | स | ब | क | पे |
| म | ग | बा | त | ख | ल | न |

(१) ________ (२) ________ (३) ________ (४) ________

(५) ________

## ९. खाली दिलेल्या चित्राचे वर्णन करा :



________________________________________

________________________________________

________________________________________

________________________________________

________________________________________

________________________________________

________________________________________

________________________________________

१०. कोणत्याही एका चित्रकथेची चित्रे येथे चिकटवा :

# ४ रंगांचे भांडण

– एकनाथ आव्हाड

एकदा रंग आभाळात
एकमेकांना भेटले
गर्वाने आपले मोठेपण
सांगतच सुटले



हिरवा म्हणे दिसे मी
गवत, झाडे, पानांत
सर्वाहून मोठा मी
हिरव्या हिरव्या रानांत

निळा रंग बडबडला
मला पाहा पाण्यात
दंग सारे होई
आकाश निळ्या गाण्यांत





पिवळा रंग ओरडे
सूर्याला रंग माझा
जगाला देई ऊब
सर्वांचा मी राजा



रंग केशरी चिडला
मी आरोग्य अन् शक्ती
फळभाज्यांशी माझीच
आहे मोठी दोस्ती

लाल रंग भडकला
रक्तात मी फार
धाडसाचा, धोक्यांचा
मीच साक्षीदार





पाऊस म्हणे रंगांना
भांडण आता पुरे
एकमेकांना पूरक तुम्ही
हेच आहे खरे

पावसाच्या गाण्यात रंग
एका रांगेत आले
भांडण सरून त्यांचे
सुंदर इंद्रधनुष्य झाले



## शब्दार्थ

**गर्व** अभिमान **दंग होणे** आश्चर्यचकित होणे **धाडस** साहस **भडकणे** चिडणे **सरणे** संपणे **रांग** ओळ **ऊब** (येथे) गरमी, उष्णता

## स्वाध्याय

**१. खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा :**

(१) रंग एकमेकांना कुठे भेटले ?

(२) हिरव्या रानात सर्वात मोठं कोण आहे ?

(३) जगाला ऊब कोणं देतं ?

(४) केशरी रंगाची कोणाशी दोस्ती आहे ?

**२. खाली दिलेल्या प्रश्नांची दोन वाक्यात उत्तरे द्या :**

(१) लाल रंग कशात अधिक असतो ? तो कशाचा साक्षीदार आहे ?

(२) पावसाने रंगांना काय सांगितले ?

**३. खाली दिलेले रंग दिसतात, अशा पाच वस्तुंची नावे लिहा :**

(१) हिरवा रंग :

______ ______ ______ ______ ______

(२) निळा रंग :

______ ______ ______ ______ ______

(३) लाल रंग :

______ ______ ______ ______ ______

## ४. नमुन्याप्रमाणे लिहा :

जसे – फळांचा राजा : आंबा

(१) पक्ष्यांचा राजा : ____________

(२) फुलांचा राजा : ____________

(३) प्राण्यांचा राजा : ____________

## ५. सूचनेनुसार करा :

(१) खाली दिलेल्या रिकाम्या जागांमध्ये कंसात दिलेले शब्द ठेवून नवे शब्द बनवा.

(भेट, बडबड, चिड, भडक)

________ ला, ________ ला, ________ ला, ________ ला

(२) नव्या बनलेल्या शब्दांवरून एक-एक वाक्य बनवा.

(३) नवे बनलेले शब्द असतील अशा ओळी कवितेतून शोधून लिहा.

## ६. खाली दिलेल्या शब्दांचे समानार्थी शब्द लिहा :

(१) आभाळ = ________ (२) पानं = ________

(३) पाणी = ________ (४) दोस्ती = ________

(५) झाड = ________ (४) रान = ________

## ७. तुम्हाला माहीत असलेली पावसावरची गाणी जमवा आणि लिहा :

____________________


____________________

____________________

____________________

____________________

* खाली दिलेल्या चित्रात रंग भरा :



*

# ५ एक होता बाळू

– संकलित



एक होता बाळू. तो तरुण व धडधाकट होता. त्याला नोकरी करणे आवडत नव्हते आणि धंदा करायचा तर जवळ पैसा नव्हता. तो निराश झाला. आळशी बनला. आता आपल्या डोक्याला कधी त्रासच द्यायचा नाही, असे त्याने ठरवून टाकले. कुणी जसे सांगेल तसेच आणि तेवढेच तो करायचा. लोक त्याला 'सांगकाम्या बाळू' म्हणू लागले.

गावात त्याचा मामा राहायचा. एकदा त्याने बाळूच्या हातात पैसे दिले आणि म्हणाला, ''सांभाळून ने. घरी आईजवळ दे.''

मामाने हातात दिलेले पैसे त्याने हातातच धरून ठेवले. रस्त्याने जाताना कुणाचा तरी धक्का लागला. ते पैसे रस्त्यात पडले. बाळूच्या लक्षात आले नाही. घरी गेल्यावर पाहतो तर हातात पैसे नाहीत ! आई रागावली आणि म्हणाली, ''मामानं पैसे सांभाळून ने म्हणून सांगितलं होतं ना ? मग ते खिशात घालून नाही का आणायचे ?''

बाळूला कळले की सांभळून आणायचे म्हणजे खिशात घालून आणायचे.

दुसऱ्या वेळी मामाने बाळूजवळ घरच्या म्हशीचे दूध तांब्यात घालून दिले आणि म्हटले, ''बाळू, सांभाळून ने. मागच्यासारखं करू नकोस.''

बाळूने मानेनेच नाही म्हटले आणि तो रस्त्याने निघाला. सांभळून नेणे म्हणजे हातांतून नेणे नव्हे तर खिशात घालून नेणे, हे त्याला आठवले. त्याने लगेच दुधाचा तांब्या खिशात ओतला !

घरी गेल्यावर आईला दुधाचा रिकामा तांब्या दिसला. ती बाळूला म्हणाली, ''यातलं दूध काय झालं ?'' बाळू म्हणाला, ''मागच्या वेळी तूच म्हणाली होतीस की सांभळून आणायचं म्हणजे खिशात घालून आणायचं. म्हणून मी दूध या खिशात ओतलं होतं. ते सगळं खिशातून खाली झिरपलं वाटतं ?''

आई पुन्हा रागावली, ''अरे, मामा तुला दुधाचा तांब्या सांभाळून ने म्हणाला नं ? तेव्हा खिशात नाही, तर डोक्यावर ठेवून आणायचा''



बाळूने मान डोलवली आणि म्हणाला, ''चुकलंच. डोकं वापरायला पाहिजे होतं. मी खिसा वापरला. यापुढं डोकंच वापरीन.''

तिसऱ्या वेळी मामाने घरी न्यायला लोण्याचा गोळा दिला आणि पुन्हा 'सांभळून ने' म्हणून बजावले आणि म्हणाला, 'डोकं वापरत जा.''

''हो'', म्हणून बाळू लोण्याचा गोळा घेऊन निघाला. डोके वापरायचे हे त्याला लगेच आठवले. त्याने लोण्याचा गोळा डोक्यावर घेतला. रस्त्याने जाताना उन्हामुळे लोणी विरघळले. बाळूच्या तोंडावर ओघळले. कपड्यांवर ठिकठिकाणी डाग पडले !

त्याचा तो अवतार पाहून आईने विचारले, ''हे काय रे बाळू ? मामानं या वेळी काय दिलं होतं ?''

बाळू म्हणाला, ''लोणी. तू आणि मामा दोघेही म्हणाला होतात ना, की सांभाळून आणायचं म्हणजे डोक्यावर ठेवून आणायचं, डोकं वापरायचं, म्हणून मी ते लोणी डोक्यावर ठेवलं.''

आई सगळे समजली आणि म्हणाली, ''अरे वेड्या, ते सांभाळून आणायचं म्हणजे केळीच्या पानात बांधून आणायचं. त्यावर खूप पाणी शिंपडायचं.''

बाळूने लगेच मान डोलवली आणि म्हणाला, ''समजलं. यापुढं चूक करणार नाही.''

चवथ्यांदा मामाने बाळूला कुत्र्याचे सुंदर पिलू दिले आणि म्हणाला, ''हे चांगल्या जातीचं कुत्रं आहे. विकून चांगले पैसे येतील. घरी सांभळून ने.''

बाळूने मामाला पिलू सांभाळून नेण्याची खात्री दिली. ते पिलू घेऊन तो निघाला. रस्त्याने केळीची चार पाने तोडली. त्यांत ते पिलू करकचून बांधले. मग त्यावर खूप पाणी शिंपडले आणि तसेच घरी आणले.




घरी येईपर्यंत ते पिलू गुदमरले.

ते पाहताच आईने कपाळावर हात मारला आणि म्हणाली, ''अरे बाळ्या अगदीच वेडा आहेस रे तू. हे काय सांभळून आणणं झालं ? खांद्यावर घ्यायचं नीट. प्राण्याला असं बांधून आणू नये.''

बाळूने जीभ चावली. ''अरे हो चुकलोच. पण यापुढं प्राण्याला बांधून आणणार नाही. खांद्यावर आणीन,'' अशी त्याने खात्री दिली.

पाचव्यांदा मामाने बाळूला उमदे गाढव दिले आणि म्हणाला, ''बाळ्या, हे गाढव भाड्यानं दे. याच्या पाठीवर माल वाहून नेता येतो. चांगले पैसे मिळतील. पण सांभळून ने. मागल्यासारखं करू नकोस हं !''

बाळूने या वेळी पक्की खात्री दिली. तो गाढव घेऊन रस्त्यावर आला. लगेच त्याच्या पोटाखाली त्याने आपली मान घातली आणि त्या गाढवाला खांद्यावर उचलले . त्याच्या ओझ्याने बाळू वाकला. गाढव लाथा मारू लागले, ओरडू लागले ! पण बाळूने, 'सांभाळून न्यायचेच' असा चंग बांधला. त्याने गाढवाला मानेवर आणखी दाबून धरले. गाढव आणखी जोराने ओरडू लागले.




ती गंमत पाहायला त्याच्यामागे मुले लागली. ती गाढवासारखी ओरडू लागली. वाकलेला बाळू, ओरडणारे गाढव आणि मागे मुले अशी वरात निघाली.

घराघरांतून लोक बाहेर येऊन ती गंमत पाहू लागले. जोरजोराने हसू लागले. एका घरातून एक मुलगी बाहेर आली. ती वरात पाहून तिलादेखील खूप हसू कोसळले. ती जोरजोराने हसून आपल्या बाबांना 'बाबा बाबा, लवकर बाहेर या' अशा हाका मारू लागली.



तिचे वडील धावतच बाहेर आले. त्यांची ती मुलगी वास्तविक मुकी होती. ती खूप हसेल तरच बोलायला लागेल, असे डॉक्टर म्हणाले होते. त्यांनी तिला हसवण्याचे खूप प्रयत्न केले होते, पण त्यांची मुलगी हसलीच नव्हती. आता ती जोरजोरात हसली आणि बोलू लागली. तिच्या वडिलांना खूप आनंद झाला.



आपली मुलगी बाळूमुळे हसली हे पाहताच त्यांनी बाळूला घरात आणले. त्याला खूप उंची कपडे दिले. खूप खूप पैसा दिला आणि एक ऐटबाज घोडा दिला.

बाळू घोड्यावर बसून घरी आला. चांगले कपडे, खूप पैसे आणि घोडा घेऊन आलेल्या बाळूला पाहताच आईला खूप खूप आनंद झाला. तिने बाळूला पोटाशी कवटाळले.

खूप पैसे मिळताच बाळूची निराशा संपली. त्याचा आळसदेखील गेला. जो जोमाने कामाला लागला. आता त्याने व्यापार सुरू केला. प्रामाणिकपणे व्यापार करून त्याने खूप पैसा कमावला.

आता लोक त्याला बाळूऐवजी 'बाळासाहेब' म्हणू लागले.

## शब्दार्थ

**गुदमरणे** श्वास कोंडणे **चंग बाधणे** निश्चय करणे

## स्वाध्याय

**१. खालील दिलेल्या प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा :**

(१) बाळू निराश का झाला ?

(२) बाळूने दुधाचा तांब्या कुठे ओतला ?

(३) बाळूने लोण्याचा गोळा कुठे ठेवला ?

(४) मुले बाळूच्या मागे का लागली ?

(५) मुलगी कुणामूळे हसली ?

(३) लोक बाळूला बाळासाहेब का म्हणू लागले ?

**२. खालील प्रश्नांची दोन-तीन वाक्यात उत्तरे लिहा :**

(१) लोक बाळूला 'सांगकाम्या' का म्हणू लागले ?

(२) बाळूने दुधाचा तांब्या खिशात का ओतला ?

(३) मामाने लोणी दिल्यावर बाळूने काय केले ?

(४) कुत्र्याचे पिलू का गुदमरले ?

(५) मुलीच्या वडिलांनी बाळूला ऐटबाज घोडा का दिला ?

**३. खालील मूळाक्षरांच्या सहाय्याने अर्थपूर्ण शब्द बनवा :**

**उदाहरण :** द, ध – दूध

| | | | |
|---|---|---|---|
| (१) घ, ड | (२) म, म | (३) ग, ढ, व | (४) ल, ण |
| (५) प, ल | (६) म, ल, ग | (७) ज, भ | (८) म, न |
| (९) ख, श, त | | | |

## ४. खालील वाक्ये कोण बोलले ते लिहा :

(१) ''सांभळून ने घरी आईजवळ दे.''

(२) ''यातलं दूध काय झालं ?''

(३) ''अरे हो चुकलोच.''

(४) ''बाबा बाबा, लवकर बाहेर या.''

## ५. 'च्या', 'चे', 'च', 'चा', 'ची', 'चं' ठेऊन खाली जागा भरा :

(१) बाळू ______ लक्षात आले नाही.

(२) बाळूला कळले की सांभाळून आणाय ____ म्हणजे खिशात घालून आणाय ____.

(३) बाळूने मानेने ______ नाही म्हटले.

(४) आईला दुधा ______ रिकामा तांब्या दिसला.

(५) केळी ______ पानात बांधून आणाय ______.

(६) रस्त्याने केळी ______ चार पाने तोडली.

(७) आपली मुलगी बाळूमुळे हसली हे पाहता ______ त्यांनी बाळूला घरात आणले.

## ६. खालील शब्दांचे विरूद्धार्थी शब्द लिहा :

(१) तरूण × ____________ (२) आवड × ____________

(३) आळशी × ____________ (४) रिकामा × ____________

(५) धडधाकट × ____________ (६) ऊंच × ____________

## ७. खालील शब्दांचे समानार्थी शब्द लिहा :

(१) आई = ____________ (२) पैसा = ____________

(३) रस्ता = ____________ (४) दूध = ____________

(५) कापड = ____________ (६) घोडा = ____________

(७) प्रामाणिक = ____________ (८) पोट = ____________

८. तुमच्या परिसरात पहावयास मिळणाऱ्या पशु-पक्ष्यांची यादी बनवा.

९. खालील शब्दांचे अनुलेखन करा :

(१) धक्का ______ (२) डोक्यावर ______

(३) तांब्या ______ (४) म्हैस ______

(५) त्रास ______ (६) लक्ष ______

(७) खात्री ______ (८) ओझे ______

(९) डॉक्टर ______ (१०) वास्तविक ______

१०. खालील शब्दांचा उपयोग करून वाक्य बनवा :

उदाहरण : मामा – मामा गावातच राहायचा.

(१) आई : ______

(२) गाढव : ______

(३) बाळू : ______

(४) रस्ता : ______

(५) लोक : ______

(६) डोकं : ______

(७) पिलूं : ______

# ६ चारोळी

– संकलित



मोर, पोपट, गरुड
नानाविध पक्षी
भरारताना आभाळात
दिसे छान नक्षी.



इकडे तिकडे सगळीकडे
आपण लावू झाडेच झाडे
झाडे दिसतील चहुकडे
पर्यावरणाचे शिकूया धडे !



एकदा उन्हाने
सूर्य तापला
त्याच्या अंगाला
घाम आला.



टीव्ही वर साबणाची जाहिरात
एकदा कावळ्याने पाहिली
लगेच दुकानात जाऊन
साबणाची वडी आणली.

## शब्दार्थ

**नानाविध** वेगवेगळे **भरारताना** उडताना **चारोळी** चार ओळी **आभाळ** आकाश **चहुकडे** चार बाजू

## स्वाध्याय

**१. खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा :**

(१) आभाळात कोणकोणते पक्षी उडताना दिसतात ?

(२) आपण झाडे लावून काय शिकूया ?

(३) सूर्य कशाने तापला ?

(४) कावळ्याने साबणाची जाहिरात कोठे पाहिली ?

(५) कावळ्याने साबणाची वडी कोठून आणली ?

**२. जोडशब्द लिहा :**

**उदाहरण :** इकडे तिकडे

(१) इथे ________ (२) जेथे ________

(३) जसे ________ (४) जेव्हा ________

(५) जर ________

**३. तुमच्या आवडत्या कवितेच्या चार ओळी लिहा :**

## ४. कंसातील योग्य शब्द शोधून वाक्यातील रिकाम्या जागा भरा :

(१) गरुड ____________ उडतो. (पाण्यात, आभाळात)

(२) आपण सगळीकडे ____________ लावू. (झाडे, फलक)

(३) सूर्य ____________ तापतो. (त्रासाने, उन्हाने)

(४) कावळ्याने साबणाची ____________ पाहिली. (जाहिरात, बादली)

## ५. योग्य जोड्या जुळवा :

| | 'अ' विभाग | 'ब' विभाग |
|---|---|---|
| १. | मोर | कावळी |
| २. | कावळा | कोकिळा |
| ३. | चिमणा | लांडोर |
| ४. | कोकिळ | चिमणी |

## ६. सूचनेप्रमाणे करा :

**उदाहरण :** पोपट – विठूविठू बोलतो

(१) कोकिळ : ____________

(२) कावळा : ____________

(३) चिमणी : ____________

## ७. कोणती चारोळी तुम्हाला गमतीदार वाटली ?

**प्रवृत्ती**

- कोणती चारोळी वाचून तुम्हाला गम्मत वाटली ? का ? कारण देऊन तुमचे उत्तर लिहा.

✻

# पुनरावर्तन २

१. **खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा :**

(१) लोक बाळूला 'सांगकाम्या बाळू' का म्हणू लागले ?

(२) बाळूने तांब्यातील दूध घरी कसे आणले ?

(३) कावळ्याने टी.व्ही. वर कशाची जाहिरात पाहिली ?

२. **खालील विधाने कोण कोणास म्हणाले ते लिहा :**

(१) "हे चांगल्या जातीचे कुत्रे आहे." ____________________

(२) "समजलं यापुढं चूक करणार नाही." ____________________

(१) "प्राण्याला असं बांधून आणू नये" ____________________

३. **(१) खालील शब्दांचे कोष्टकातून समानार्थी शब्द शोधा आणि त्यांना ⬭ अशी खूण करुन ते शब्द लिहा :**

(शक्ती, जोम, उंची, ऐटबाज, धाडस)

| | | | | |
|---|---|---|---|---|
| व | उ | किं | म | ती |
| डी | ख | त्सा | का | व |
| ल | ड | सा | ह | स |
| रु | बा | ब | दा | र |
| ढ | न | ळ | ट | क |

(१) ____________________ (२) ____________________

(३) ____________________ (४) ____________________

(५) ____________________

**( २ ) खालील कोष्टकातून दिलेल्या शब्दांचे विरूद्धार्थी शब्द शोधून त्यांना ⬭ अशी खूण करा आणि ते शब्द लिहा :**

(अशा, मोठा, आळशी, विकणे, हसणे, गरीब)

| | | | | |
|---|---|---|---|---|
| उ | ठ | नि | रा | शा |
| ड | द्यो | सा | र | स |
| क | ळ | गी | ड | श्री |
| ख | री | द | णे | मं |
| च | ल | हा | न | त |

(१) ____________ (२) ____________

(३) ____________ (४) ____________

(५) ____________ (६) ____________

**४. खालील शब्दसमूहासाठी एक शब्द लिहा :**

(१) साक्ष देणारा : ____________

(२) काम करण्याचा कंटाळा : ____________

(३) सांगू तेवढेच काम करणारा : ____________

**५. कंसातील योग्य शब्द निवडून वाक्यातील रिकाम्या जागा भरा आणि वाक्ये पुन्हा लिहा :**

(१) बाळूने दुधाचा तांब्या ____________ ओतला. (खिशात, डोक्यावर)

(२) उन्हामुळे ____________ विरघळले. (दूध, लोणी)

(३) बाळूने ____________ व्यापार केला. (प्रामाणिकपणे, लबाडीने)

(४) रंगांनी आपला मोठेपणा ____________ सांगितला. (लाजून, गर्वाने)

६. तुमच्या आवडत्या काव्याच्या चार ओळी लिहा :

७. सूचनेप्रमाणे करा :

(१) क, म, न मुळाक्षरापासून सुरुवात होणारे शब्द लिहा.

(२) वरील शब्दांतील जोडाक्षरे आणि जोडाक्षर नसलेले शब्द वेगळे लिहा.

(३) वरील शब्दांशिवाय इतर पाच जोडाक्षरे लिहा.


# मराठी

## इयत्ता ३

### ( द्वितीय सत्र )

# ७ मुंगी आणि कबूतर

– ( चित्रकथा )



## स्वाध्याय

### १. खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा :

(१) कबूतराने पाण्यात पान कशासाठी टाकले ?

(२) मुंगी कोठे राहते ? कबूतर कोठे राहते ?

### २. पुढील शब्दांचा उपयोग करून वाक्ये बनवा :

**उदाहरण :** पाणी : हे पाणी फार थंड आहे.

(१) झाड : ______________________

(२) पारधी : ______________________

(३) कबूतर : ______________________

(४) मुंगी : ______________________

(५) जाळे : ______________________

### ३. सूचनेप्रमाणे करा :

(१) तुमच्या वर्गात दिसणाऱ्या वस्तूंची यादी तयार करा.

(२) यादीतल्या प्रत्येक वस्तूचा उपयोग केव्हा व कसा होतो ते लिहा.

### ४. खालील शब्दांचे अनुलेखन करा :

(१) पारधी ____________ (२) नदीकाठ ____________

(३) दंश ____________ (४) मैत्री ____________

(५) ____________

खाली दिलेल्या कोष्टकातून पक्षी आणि वृक्षांची नावे शोधा व लिहा :

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| आ | प्र | ली | ष | मो | सु |
| शो | क | डु | लिं | ब | र |
| की | डी | का | व | ळा | णी |
| सु | मा | ळ | ड | म | आं |
| ज | प | ना | चि | त्र | बा |
| पिं | सु | धो | को | कि | ळ |

उत्तरे : पक्षी वृक्ष

(१) ____________ (१) ____________

(२) ____________ (२) ____________

(३) ____________ (३) ____________

(४) ____________ (४) ____________

६. चित्रकथेतील कोणत्याही एका चित्राचे वर्णन तीन-चार वाक्यांत लिहा :

# ८ आजीचें घड्याळ

– केशवकुमार



आजीच्या जवळीं घड्याळ कसलें आहे चमत्कारिक,
देई ठेवुनि तें कुठें अजुनि हें नाहीं कुणा ठाउक;
त्याची टिक् टिक् चालते न कधिंही, आहे मुकें वाटतें;
किल्ली देइ न त्यास ती कधिं, तरी तें सारखें चालतें ! १

''अभ्यासास उठीव आज मजला आजी पहांटे तरी,''
जेव्हां मी तिज सांगुनी निजतसें रात्रीं बिछान्यावरी.
साडेपांचहि वाजतात न कुठें तों हांक ये नेमकी,
''बाळा झांजर जाहलें, अरवला तो कोंबडा, ऊठ कीं !'' २

ताईची करण्यास जम्मत, तसें बाबूसवें भांडतां
जाई संपुनियां सकाळ न मुळीं पत्ता कधीं लागतां !
''आलीं ओटिवरी उन्हें बघ !'' म्हणे आजी, ''दहा वाजले !
जा जा लौकर !'' कानिं तो घणघणा घंटाध्वनी आदळे. ३

खेळाच्या अगदीं भरांत गढुनी जातां अम्ही अंगणीं
हो केंव्हा तिनिसांज तें न समजे ! आजी परी आंतुनी
बोले, ''खेळ पुरे, घरांत परता ! झाली दिवेलागण,
ओळीनें बसुनी म्हणा परवचा ओटीवरी येउन !'' ४

आजीला बिलगून ऐकत बसूं जेव्हां भुतांच्या कथा,
जाई झोंप उडून, रात्र किति हो ध्यानीं न ये ऐकतां !
''अर्धी रात्र किं रे'' म्हणे उलटली, ''गोष्टी पुरे ! जा पडा !''
लागे तों धिडधांग पर्वतिवरी वाजावया चौघडा. ५

सांगे वेळ, तशाच वार-तिथिही आजी घड्याळांतुनी
थंडी पाउस ऊनही कळतसे सारें तिला त्यांतुनी !
मौजेचें असलें घड्याळ दडुनी कोठें तिनें ठेविलें ?
गाठोडें फडताळ शोधुनि तिचें आलों ! तरी ना मिळे ! ६

## शब्दार्थ

**चमत्कारिक** विचित्र **ओटी** घरापुढील उंच कट्टा **तिनिसांज** दिवेलागणीची वेळ **बिलगणे** मिठी मारणे **पर्वती** पुण्यातील एक ठिकाण **फडताळ** भिंतीतील कपाट **घंटाध्वनी** घंटेचा आवाज

**दडुनी** लपवून **चौघडा** पहाटेच्या वेळी देवळात वाजणारे वाद्य **झांजर होणे** पहाटे उजाडणे **परवचा म्हणणे** पाढे म्हणणे **गढून जाणे** कामात मग्न होणे

## स्वाध्याय

### १. खालील प्रश्नांची उत्तरे लिहा :

(१) आजीचे घड्याळ कसे चालते ?

(२) कवीला पहाटे उठविण्याचे काम कोण करते ?

(३) कवीची सकाळ कशी संपते ?

(४) मुले परवचा केंव्हा म्हणतात ?

(५) भुतांच्या कथा ऐकताना कवीची अवस्था कशी होते ?

(६) कवीने आजीचे घड्याळ कोठे कोठे शोधले ?

### २. खालील शब्दांसाठी कवितेतील शब्द लिहा :

(१) विचित्र ______ (२) गंमत ______

(३) पहाट ______ (४) कपाट ______

### ३. सूचनेप्रमाणे करा :

(१) रिकाम्या जागी योग्य शब्द लिहा :

(१) ______ आरवतो. (२) ______ कूजन करते.

(३) ______ खिंकाळतो. (४) ______ गर्जना करतो.

(२) सात वारांची नावे लिहा. प्रतिपदा ते पौर्णिमा आणि प्रतिपदा ते अमावस्या या तिथींची नावे लिहा व समजून घ्या.

(३) पहाट, सकाळ, दुपार, संध्याकाळ, रात्र या शब्दांचा वाक्यात उपयोग करा.

## ४. काव्यपंक्ती पूर्ण करा :

अभ्यासास उठीव ______

______

______

______ ऊठ की.

## ५. खालील शब्द शब्दकोशाच्या क्रमाप्रमाणे लिहा :

बिछाना, कोंबडा, जम्मत, खेळ, पर्वती, मुके

(१) ______ (२) ______ (३) ______

(४) ______ (५) ______ (६) ______

## ६. सूचनेप्रमाणे करा :

**उदाहरण :** अंगण – अंगणी

(१) रात्र ______ (२) घर ______

(३) दार ______ (४) दुपार ______

(५) सकाळी ______ (६) वन ______

### प्रवृत्ती


- तुमच्या आजीविषयी काय सांगाल ? पाच वाक्ये लिहा.

# ९ चिंगीचा पराक्रम

- ना. धो. ताम्हनकर

दसऱ्याच्या आदल्या रात्रीची गोष्ट. आमच्या गावी प्रो. विक्रम ह्यांच्या सर्कशीचा खेळ होता. उद्या दसऱ्याची सुट्टी असल्यामुळे आम्ही आणि डॉक्टरांनी सर्व मंडळींसह खेळ बघायला जायचे ठरविले होते. आमच्या ह्या बेतामुळे चिंगीचा आनंद गगनात मावेनासा झाला होता. दिवे लागावयाच्या आधीपासून ती निघायची घाई करू लागली होती. साडेनवाला आम्ही डॉक्टरांनी आणलेल्या मोटारीतून तंबूवर गेलो.

विक्रम सर्कस खरोखरच प्रेक्षणीय होती व तिच्या लौकिकामुळे आजूबाजूचे लोकही खूप येत होते. शेकडो बैलगाड्या आणि दहावीस मोटार लॉऱ्या पटांगणापुढे सुटल्या होत्या.



खेळ सुरू झाला. पहिल्यांदा लाकडी रिफांच्या बुरुजावर सायकली पळविण्याचा कार्यक्रम झाला तो सर्वांनाच आवडला. सरळ जमिनीवर सायकल चालवतांना विठ्ठलराव मास्तर पडतात आणि अशा वाकड्यातिकड्या पळवतांना हे सर्कसवाले का पडत नाहीत असे प्रश्न चिंगी विचारीत होती. खेळ बघण्यात गर्क झालेल्या डॉक्टरीणबाई 'गप्प बस' असे तिला दटावीत होत्या.

घोड्यावर, टेबलावर, शिडीवर चाललेल्या कसरतींतही मौज होती.

चिंगी त्यावर तर खूष होतीच; पण विदूषकाने खेळात चालवलेली गमतीदार लुडबुड पाहून तिची हसता हसता मुरकुंडी वळत होती. त्या दिवशी कलेक्टरसाहेब खेळ पाहायला आले असल्यामुळे सर्कसवाले शेलकी कामे करून दाखवीत होते. मालक प्रो. विक्रम काळ्या कोटावर सोन्याचांदीची पदके लटकावून सिंहाचे काम घ्यायला आले, तेव्हा चिंगीला सिंहापेक्षा त्यांचीच गंमत वाटली. ती आईला म्हणाली,' आपल्या डॉक्टरांनी सर्कस काढली तर त्यांनाही अशी छान पदक मिळतील नाही ग आई ? मी सांगते त्यांना एक सर्कस काढायला.'

'पुरे ग' म्हणून डॉक्टरीणबाईंनी चिंगीला तिच्या खुर्चीवर दाबून बसविले.

खेळ पुरा होत आला. शेवटला झूल्याचा एक कार्यक्रम राहिला. त्यावेळी मालकांनी कलेक्टरसाहेबाला पानसुपारी केली. साहेबांच्या सन्मानार्थ त्यांनी लांबलचक भाषण केले. चिंगीला ते ऐकता ऐकता कंटाळा आला. ती पेंगायला लागली आणि आईला घरी जाऊ या म्हणून तगादा करायला लागली. डॉक्टरीणबाई खेळ पुरा झाल्यावाचून उठायला तयार नव्हत्या. त्या म्हणाल्या, 'झोप यायला लागली तर नीज जाऊन गाडीत.'

चिंगी तंबूबाहेर गेली.

खेळ संपला. गर्दीतून आपल्या मोटारीपर्यंत पोचायला आम्हाला वीस पंचवीच मिनिटे थांबावे लागले. गर्दी ओसरल्यावर आम्ही गेलो. गाडीचे दार उघडताच डॉक्टरीणबाई ओरडल्या, 'अगबाई चिंगी ! गाडीत झोपायला म्हणून ती मघाशीच उठून आली !'

मग आमची धावपळ काय विचारता ! तंबूभोवती चार प्रदक्षिणा घालूनही चिंगीचा पत्ता लागला नाही ! तंबूतल्या बत्त्या विझल्यावर आम्ही घरी परतलो. खेळ पाहून मन खुलले ते आता काळजीने उदास झाले. मंडळींना घरी पोचवून मी आणि डॉक्टर गावभर तिरपिटलो. कोठेच पोरीचा पत्ता लागेना. डॉक्टरीणबाई घरी रडत बसल्या होत्या. ही त्यांची समजूत घालीत होती. सारी रात्र आम्ही काय करायचे ह्या काळजीत जागून काढली.

उजाडले आणि आजूबाजूच्या गावी चक्कर मारून यावे असा आमचा बेत सुरू झाला. एकदोन गावी आम्ही जाऊनही आलो पण पत्ता नाही !

गाडीत जाऊन झोप, अशी आईची आज्ञा मिळताच चिंगी तंबूबाहेर गेली आणि समोरच उभी असलेल्या एक मोटार लॉरीत ड्रायव्हरशेजारच्या जागी झोपली. ती लॉरी रामगावच्या इनामदारांच्या मुलामाणसांना घेऊन आली होती. खेळ संपल्यावर सगळी माणसे आली ही खात्री होताच ती रामगावला निघून गेली. एक मुलगी पुढे झोपली आहे, पण ती आपल्यातलीच कोणीतरी असेल

असे त्याला वाटले आणि अंधारात नीट निरखून पाहाण्याचे कष्ट कोणी घेतले नाहीत. घरी पोचल्यावर मात्र आपण दुसऱ्याच कोणाची मुलगी पळवून आणली असे त्यांना कळले आणि तिला आता तिच्या आईबापांकडे कशी पोचवायची हा इनामदारांना मोठा पेच पडला. त्यांनी चिंगीला जागी करून ती कोणाची कोण, हे विचारून घेण्याचा प्रयत्न केला; पण पोरीवर झोपेने इतका अंमल बसवला होता की, ती एका प्रश्नाचेही धड उत्तर देईना.

'बाळ, जागी हो बघू ? हां, उघड डोळे. तू कोणाची मुलगी ?' असे प्रश्न तिला दहादा तरी त्यांनी विचारले. पण डोळे उघडण्याऐवजी चिंगी ह्या कुशीवरून त्या कुशीवर वळे. एकदा फारच घुसळल्यावर ती म्हणाली, 'रंगे, हे ग काय तुझं ? आता मला त्रास देशील तर बाईंना सांगीन बघ'

तिच्यावरील हा झोपेचा अंमल बघून इनामदारीणबाई म्हणाल्या, 'झोपूं दे बिचारी. आता उजाडायला आलंच आहे. अंमळशाने आपोआप जागी होईल; मग विचारून घेऊन पोचवायला येईल. आई काळजी करीत असेल; पण प्रहरभर काळजी केली तशी दोन प्रहर.'

आठ वाजता चिंगी जागी झाली आणि अनोळखी जागी अनोळखी माणसे पाहून ती कावरीबावरी झाली. 'तुम्ही कोण ? आई कुठाय् ? तिने विचारले.' तिचे डोळे पाण्याने डबडबले.

'भिऊं नको हं बाळ. तुझी आई नि बाबा इथेच आहेत. तू झोपलीवतीस म्हणून बाहेर गेलेत. आत्तां येतील.'

'खोटं सांगतांय् मला बाबा आहेत तरी वाटतं ? माझे डाक्तर आहेत. ते ह्या वेळी दवाखान्यात जातात. उगीच कुठेतरी नाही जातं नि आई त्यांच्याबरोबर कध्धी जात नाही सकाळी.'

अशाच थोड्या बोलण्यावरून इनामदार मंडळींना कळून चुकले की, ही डॉक्टर सदानंदांची–आपल्या नेहमीच्या डॉक्टरांची–मुलगी चिंगी.

'आता तू आमच्या पुष्पाताईबरोबर खेळ, मजा कर.' इनामदार म्हणाले.

'पण आई नि डाक्टर ! चिंगी गहिवरली.'

'मी आता बोलावून आणतो त्यांना. जा तू फराळ कर, खेळ हा बघ मी निघालो.'

इनामदारांच्या ह्या आपुलकीने चिंगीची भीती पळाली. ती पुष्पाताईबरोबर घरात गेली. एकमेकींच्या संगतीत दोघी रमल्या. चिंगीचा ठावठिकाणा लागत नाही म्हणून आम्ही कपाळाला हात लावून बसलो होतो. दसऱ्याच्या सणाचा दिवस; पण सुतकी कळा घरात पसरली होती. जेवणाचीही आठवण नव्हती कोणाला !

दुपारचे बारा वाजून गेले. दारात मोटार थांबली. वाटले कोणीतरी चिंगीला घेऊन आले; पण

रामगावकर इनामदार पुढे येऊन उभे राहिले. दु:खाच्या वेळी ओळखीची माणसे आली तरी आनंदापेक्षा उदासवाणेच वाटते. डॉक्टरनी त्या थोर माणसाचे स्वागत नेहमीच्या हसतमुखाने केले नाही.

'दसऱ्याचं सोनं द्यायला आलोय मी डॉक्टरसाहेब.'

डॉक्टर गप्पच !

'पण इथे मी ते देणार नाहीं. आमच्या घरी आलं पाहिजे तुम्हाला.'

'आज मी कुठे येऊं शकत नाही इनामदारसाहेब.'

'खास येऊ शकाल. एकटेच नव्हे, तर बाई सुद्धा. चिंगीसाठी तुम्ही येणार नाही हे शक्य तरी कसं आहे ?'

'चिंगीसाठी ? ती तुमच्याकडे आहे ?' आम्ही सर्वजण उद्गारलो. इनामदारसाहेब म्हणजे प्रत्यक्ष परमेश्वर वाटले आम्हाला. त्यांच्याबरोबर आम्ही आनंदाने रामगावला गेलो.

दुपारचे दोन वाजून गेले तेथे पोचायला. चिंगीने दर्शन झाले तेव्हा सारा शीण ओसरून गेला आणि इनामदारांच्या घरच्या मेजवानीवर आम्ही यथास्थित हात मारला.

'दसऱ्याचं सीमोल्लंघन म्हणजे ग काय आई ?' चिंगीने विचारले.

'तू आज केलं आहेस नि आम्हालाही करायला लावलं आहेस तेच,' मी म्हणालो.

'पण असं नित्य व्हायला पाहिजे. चिंगीने दिवाळीलाही आलं पाहिजे असं पुष्पा म्हणतेय.' इनामदारीणबाई म्हणाल्या.

'नि ती माझ्याबरोबर आमच्या मुंबईच्या शाळेतही येऊं दे हो डॉक्टर. आमच्या बोर्डिंगात मज्जा असते नि आमच्या बाई किती किती छान आहेत.' पुष्पा म्हणाली.

एखादे वेळी सहजगत्या बोललेली गोष्ट खरी ठरते त्याची मौज वाटते. चिंगी दिवाळीला तर इनामदारांकडे गेलीच, पण पुष्पाबरोबर तिला डॉक्टरांनी मुंबईलाही पाठवले.

आमची रोजची करमणूक आता दूर गेली.

## शब्दार्थ

**आदल्या** आधीच्या **बेत** योजना **प्रेक्षणीय** पाहण्यासारखे **मौज** मजा **शेलकी** विशेष **बत्त्या** दिवे **तिरपिटणे** फिरणे, रखडणे **झोपेचा अंमल** झोपेची गुंगी **अंमळशाने** थोड्या वेळाने **प्रहर** तीन तासांचा काळ **सुतकी कळा** दु:खी अवस्था **उद्‌गारणे** बोलणे **शीण** थकवा

**यथास्थित** चांगला **सीमोल्लंघन** सीमाओलांडणे **बोर्डिंग** राहण्याची व जेवणाची व्यवस्था असलेले ठिकाण **आपुलकी** आपलेपणा **आनंद गगनात न मावणे** अतिशय आनंद होणे, **हसता हसता मुरकुंडी वळणे** खूप हसू येणे **पानसुपारी करणे** सत्कार करणे **पेच पडणे** प्रश्न पडणे **कावरेबावरे होणे** अतिशय घाबरणे **गहिवरणे** मन भावेनेन भरून येणे **कपाळाला हात लावणे** अतिशय दु:खी होणे **मेजवानीवर हात मारणे** पोटभर जेवणे

## स्वाध्याय

### १. खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे द्या :

(१) चिंगी कोणती सर्कस पहायला गेली होती ?

(२) चिंगी सापडली नाही म्हणून तिच्या आईवडीलांनी कायकाय केली ?

(३) चिंगी रामगावच्या इनामदारांकडे कशी गेली ?

(४) इनामदारीणबाईंनी चिंगीला पुन्हा केंव्हा बोलावले ?

(५) पुष्पाने चिंगीला पुन्हा केंव्हा बोलावले ?

### २. खालील शब्दांचा उपयोग करुन वाक्य बनवा :

**उदाहरण :** मी **मोटारीतू** फिरायला गेलो.

(१) सर्कस : ____________________

(२) विदूषक : ____________________

(३) सायकल : ____________________

(४) बैलगाडी : ____________________

(५) सिंह : ____________________

### ३. सूचनेप्रमाणे करा :

(१) या पाठातील तुम्हाला कोणती दोन पात्रे जास्त आवडतात ? का ?

(२) सर्कशीबद्दल पाच वाक्ये लिहा.

### ४. खालील शब्दांचे समानार्थी शब्द लिहा :

(१) बेत = ________ (२) मजा = ________ (३) शीण = ________

### ५. खालील शब्दांचे विरूद्धार्थी शब्द लिहा :

(१) सन्मान × ________ (२) दिवस × ________

(३) प्रश्न × ________ (४) अंधार × ________

### ६. या पाठातील पात्रांची नावे लिहा :

________

________

________

________

________

________

________

________

# १० आईस पत्र

– संकलित

करजगाव, ता. अचलपूर,
जिल्हा अमरावती.
दिनांक : १५-१०-२०१३

ती. सौ. आईस

शिरसाष्टांग नमस्कार.

मामाबरोबर मी आणि सगुणा एसटीने इकडे आलो. सुखरूप पोचलो. काळजी नसावी.

अग, मोटार सुरू झाली आणि गार वारा खाऊन सगुणा लगेच डुलक्या घ्यायला लागली. मामाच्या आणि माझ्यामध्ये ती बसली होती म्हणून बरे झाले. नाहीतर खालीच कलंडली असती.

रस्त्याने फार मजा आली. झाडे आमच्या विरुद्ध दिशेने पळताना दिसत होती. नुसती झाडच नाहीत, तर शेतातील पिके आणि झोपड्याही पळत होत्या. सगुणा झोपल्याने तिला काही हे पाहता आले नाही.

मामाचे गाव आले. आम्ही गाडीतून उतरलो. हे कोण, म्हणून गावकरी आमच्याकडे पाहत होते. 'भाचरे दिवाळीला आली आहेत' असे मामा प्रत्येकाला सांगत होता. मी पाचवीत आहे आणि सगुणा दुसरीत आहे हे कळून इथल्या सर्वांना फार कौतुक वाटले.



घरी आल्या-आल्या आम्ही हातपाय, तोंड धुतले. कपडे बदलले. मग आजी, आजोबा आणि मामी यांच्या पाया पडलो. आजोबांनी पाठीवर हात फिरवून आशीर्वाद दिला. आजीने कुरवाळून पोटाशी धरत म्हटले, 'केवढे मोठे झालात रे बाळांनो !' आणि मग कंबरेचा बटवा काढून खडीसाखरेचा एकेक खडा आमच्या हातावर ठेवला. एवढ्यात मामीने फराळाच्या बशा आणून ठेवल्या. पण आमचे लक्ष अंगणात खेळणाऱ्या मुलांकडे लागले होते. मुले एका कोपऱ्यात किल्ला तयार करत होती. आम्ही त्यात सामील झालो.

संध्याकाळ केव्हा झाली आणि अंधार केव्हा पडला हे मुळी कळलेच नाही. मग आम्ही हातपाय धुतले. मामीने ओटीवर पणत्या लावून ठेवल्या होत्या. आम्ही 'शुभं करोति' म्हटले.

रात्रीचे जेवण झाल्यानंतर आजीच्या भोवती आम्ही रेंगाळत राहिलो. सगुणा म्हणाली, "आजी, आजी, गोष्ट सांग ना."

आजी गोष्ट सांगायला लागली. ऐकता-ऐकता सगुणा पेंगुळली. मलाही केव्हा झोप लागली ते समजलेच नाही.

पहाटे जाग आली ती कोंबड्याच्या आरवण्याने. पक्ष्यांचा किलबिलाटही ऐकू येत होता. आम्ही उठलो. सगळे उरकले. धारोष्ण दूध प्यालो. अग, काय छान लागले !

आणि आता मामाने पत्र लिहायला बसवले आहे. पत्र चांगले मोठे लिही-असे तो म्हणाला.

आम्ही तुमची खूप खूप वाट पाहत आहोत. लौकर लौकर या. ती. बाबांना साष्टांग नमस्कार. टिपू आणि मनी यांना इकडे येताना कुठे ठेवाल ? त्यांना आमची आठवण येते का ?

तुझा लाडका,
बाबू



## शब्दार्थ

**डुलक्या घेणे** झोप येणे **गावकरी** गावात राहणारे लोक **भाचरे** भाचे (बहिणीची मुले) **सामील होणे** सहभागी होणे **कुरवाळणे** प्रेमाने डोक्यावरून हात फिरविणे **शुभं करोति** दिवे लागणीच्या वेळी दिव्यापुढे म्हणायची प्रार्थना **रेंगाळणे ( येथे )** आजुबाजुला फिरणे **धारोष्णे** गाय किंवा म्हैस यांचे नुकतेच काढलेले दूध **किलबिलाट** अनेक पक्ष्यांचा आवाज

## स्वाध्याय

### १. खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे द्या :

(१) बाबू कोणाच्या गावाला गेला होता ?

(२) एसटीने जाताना वाटेत बाबूला काय काय दिसले ?

(३) मामाच्या घरी आल्यावर बाबू आणि सगुणा यांनी काय केले ?

(४) अंगणात जमून मुले काय करत होती ?

(५) मुलांना पहाटे कशाने जाग आली ?

### २. खालील दिलेल्या शब्दांचा उपयोग करून वाक्ये लिहा :

**उदाहरण :** नमस्कार – आपण देवाला नमस्कार करतो.

(१) गावकरी : ______________________

(२) आशीर्वाद : ______________________

(३) पहाट : ______________________

(४) किलबिलाट : ______________________

(५) आठवण : ______________________

### ३. उदाहरणानुसार लिहा :

**उदाहरण :** आले – येणे

(१) सांगितले ____________ (२) गेले ____________

(३) खाल्ले ____________ (४) केले ____________

(५) दिले ____________ (६) मिळाले ____________

## ४. सूचनेनुसार करा :

(१) दिवाळीत तुम्ही काय काय करता ? उदाहरणाप्रमाणे करा.

**उदाहरण :** दिवाळीत आम्ही पहाटे लवकर **उठतो**. (उठ)

(१) आम्ही किल्ला ____________. (बनव)

(२) आम्ही रांगोळी ____________. (काढ)

(३) आम्ही फराळ ____________. (कर)

(४) आम्ही फटाके ____________. (फोड)

(५) आम्ही दारापुढे पणत्या ____________. (लाव)

## ५. उदाहरणानुसार कसे, कसा कशी चा योग्य उपयोग करा :

**उदाहरण :** टोपी – कशी

(१) तोरण ____________ (२) चीकू ____________

(३) कागद ____________ (४) नदी ____________

(५) घरं ____________ (६) आकाश ____________

## ६. खाली दिलेल्या वाक्यांना धड्यातील क्रमानुसार लावून परत लिहा :

(१) एवढ्यात मामीने फराळाच्या बशा आणून ठेवल्या.

(२) पक्ष्यांचा किलबिलाटही ऐकू येत होता.

(३) मामाबरोबर मी आणि सगुणा एसटीने इकडे आलो.

(४) सगुणा झोपल्याने तिला काही हे पाहता आले नाही.

(५) आजोबांनी पाठीवर हात फिरवून आशीर्वाद दिला.

(१) ______________________________

(२) ______________________________

(३) ______________________________

(४) ______________________________

(५) ______________________________

**प्रवृत्ती**

- 'शुभं करोति' हा श्लोक शिक्षकांकडून शिकून घ्या आणि रोज संध्याकाळी देवापुढे म्हणा.

❊

# पुनरावर्तन ३

## १. खालील प्रश्नांची उत्तरे लिहा :

(१) कबूतराचा बचाव कसा झाला ?

(२) कवीची सकाळ कशी संपते ?

(३) चिंगी कोणती सर्कस पहायला गेली होती ?

## २. खालील शब्दांचे उपयोग करून वाक्ये बनवा :

**उदाहरण :** मैत्री : मैत्री शाळेत जाते.

(१) घड्याळ : ____________________

(२) आजी : ____________________

(३) चिंगी : ____________________

(४) मामा : ____________________

(५) अभ्यास : ____________________

(६) घंटा : ____________________

(७) रात्र : ____________________

## ३. खाली दिलेल्या शब्दांचे विरूद्धार्थी शब्द लिहा :

**उदाहरण :** रात्र × दिवस

(१) अपमान × __________ (२) लक्ष × __________

(३) उत्तर × __________ (४) खूप × __________

(५) अंधार × __________ (६) स्वच्छ × __________

## ४. काव्यपंक्ती पूर्ण करा :


ताईची करण्यास ______________________

______________________

______________________

______________________ घंटाध्वनी आदळे.

## ५. चित्र पाहून त्याचे वर्णन करा :



______________________

______________________

______________________

______________________

______________________

______________________

*

# ११ पतंग

– अ. ज्ञा. पुराणिक

पतंग उडवूं चला
गड्यांनों, पतंग उडवूं चला. ॥ ध्रु ॥

रंग ढगांवर मावळतीचा
लाल पिंवळसर किती मजेचा
झुळझुळ वारा नदीकांठचा
बाजुस डोंगरमळा.

करूं चला सुरवात बरोबर
सोडा सोडा रीळ भराभर
पतंग चढवा हे वाऱ्यावर
ढगांस भेटायला.



मउमउ वाळुंत पाय रोवुनी
देऊं झटका दोरा ओढुनि
पतंग जातिल वर वर चढुनी
पंख नको त्यांजला.

जशी पांखरे आभाळांत
पंख पसरुनी तरंगतात
दिसतिल तैसे पतंग रंगित
खेळ किती चांगला !

सूर्य डोंगराआड लपेल
काळा बुरखा जग घेईल
खेळ तोंवरी हा चालेल
मजेदार आपुला.

## शब्दार्थ

**डोंगरमळा** डोंगर उतारावरील शेतमळे **गड्यांनो** मित्रांनो **तैसे** तसे **डोंगराआड** डोंगराच्या मागे **मावळती** पश्चिम दिशा **त्याजला** त्याला

**नोंद :** काळा बुरखा जग घेईल–सर्वत्र अंधार होणे.

## स्वाध्याय

### १. खालील प्रश्नांची उत्तरे द्या :

(१) पतंगाचा सण कोणता ? तो कोणत्या दिवशी येतो ?

(२) पतंग उडविताना निसर्गातील वातावरण कसं आहे ?

(३) मुले कशाप्रकारे पतंग उडवीत आहेत ?

(४) आकाशामध्ये उडणारे पतंग कसे दिसतात ?

(५) पतंग उडविण्याचा खेळ किती वेळ चालत आहे ?

### २. कंसातून योग्य शब्द निवडून ओळी पूर्ण करा :

(वाळुंत, पतंग, ढगांवर, सूर्य)

(१) रंग ________ मावळतीचा.

(२) मउमउ ________ पाय रोवुनी.

(३) दिसतिल तैसे ________ रंगित.

(४) ________ डोंगराआड लपेल.

### ३. सूचनेप्रमाणे करा :

(१) तुम्हाला माहीत असलेले पतंगांचे वेगवेगळे प्रकार लिहा.

(२) संक्रांतीच्या दिवशी तुम्ही काय काय करता ? त्याविषयी तीन वाक्ये लिहा.

______________________________

______________________________

______________________________

**४. र अक्षरात येत असेल असे शब्द कवितेतून शोधून लिहा :**

**उदाहरण :** रंग

(१) ________ (२) ________ (३) ________

(४) ________ (५) ________ (६) ________

(७) ________ (८) ________ (९) ________

**५. खाली दिलेल्या अक्षरांना काना-मात्रा देऊन अर्थपूर्ण शब्द बनवा :**

**उदाहरण :** प.त.ग. - पतंग

(१) ढ.ग.व.र. ________ (२) प.व.ळ.स.र. ________

(३) झ.ळ.झ.ळ. ________ (४) ड.ग.र.म.ळ. ________

(५) म.ज.द.र. ________ (६) प.ख. ________

(७) प.ख.र ________ (८) ख.ळ. ________

(९) स.य. ________ (१०) ड.ग.र.अ.ड. ________

**६. खाली दिलेल्या सूचनेनुसार लिहा :**

(१) सहा फुलांची नांवे :

(१) ________ (२) ________ (३) ________

(४) ________ (५) ________ (६) ________

(२) सहा सणांची नांवे.

(१) ______ (२) ______ (३) ______

(४) ______ (५) ______ (६) ______

(३) सहा मराठी महिन्याची नांवे.

(१) ______ (२) ______ (३) ______

(४) ______ (५) ______ (६) ______

(३) सहा पक्ष्यांची नांवे.

(१) ______ (२) ______ (३) ______

(४) ______ (५) ______ (६) ______

## ७. खाली दिलेल्या शब्दासारखे शब्द बनवा :

**उदाहरण :** भर – भराभर

(१) फट ______ (२) घळ ______

(३) पळ ______ (४) धन ______

(५) सट ______ (६) घट ______

(७) पट ______ (८) टन ______

## ८. कवितेच्या ओळी पूर्ण करा :

मउमउ ______

______

______

______ त्यांजला.

✻


# १२ श्रावण बाळ

– पं. महोदवशास्त्री जोशी

श्रावण नावाचा एक मुलगा होता. तो खूप खूप चांगला होता. त्याचे आईवडिलांवर खूप प्रेम होते. तो त्यांची सेवा करी नि त्यांच्या आज्ञेत राहत असे.

श्रावणाशिवाय त्याच्या आईवडिलांना चैन पडत नसे. त्यांचेही श्रावणावर फार प्रेम होते.

काही दिवसांनी श्रावणाचे आई–वडील म्हातारे झाले. त्यांना चालता येईना. डोळ्यांनी काही दिसेना. त्यांना काशीयात्रेला जाण्याची इच्छा झाली. ती इच्छा त्यांनी श्रावणाला सांगितली.



श्रावणाने मोठ्या आनंदाने ते कबूल केले. त्याने एक मोठी कावड आणली. त्यातल्या एका पारड्यात आईला बसविले आणि दुसऱ्या पारड्यात वडिलांना बसवले. कावड खांद्यावर घेतली आणि तो काशीला जायला निघाला.

एके दिवशी, रानातून जात असताना वाटेत अंधार पडला. त्याने कावड खाली ठेवली.

आई-वडिलांना तहान लागली, म्हणून तो पाणी आणायला निघाला. खूप दूर गेल्यावर त्याला एके ठिकाणी तळे दिसले.

श्रावणाने झाडाच्या पानाचा द्रोण केला. तो पाण्यात बुडवला तेव्हा 'बुऽडूऽऽक बुऽडूऽऽक' असा आवाज आला नि इतक्यात एक बाण 'सुंऽ सूं' करत श्रावणाच्या छातीत घुसला. श्रावण "आईऽऽग !" असे जोरात ओरडून खाली पडला.

राजा दशरथाने तो बाण मारला होता. तो धावत तेथे गेला. श्रावणाला पाहून त्याला खूप वाईट वाटले. त्याने हलकेच श्रावणाचे डोके मांडीवर घेतले. त्याच्या छातीतला बाण हलकेच काढला नि म्हटले,

"बाळ मला क्षमा कर. आवाजाच्या दिशेने बाण सोडला तेव्हा अंधार होता. मला वाटले एखादे हरिण पाणी प्यायला आले असावे, म्हणून मी बाण सोडला."

तेव्हा श्रावण हळू आवाजात म्हणाला,

"राजा ! माझे आई-वडील तहानलेले आहेत. त्यांना तू अगोदर पाणी नेऊन दे. माझी काळजी करू नकोस."

असे म्हणत श्रावणाने प्राण सोडला.

दशरथ श्रावणाच्या आई-वडिलांकडे पाणी घेऊन गेला तेव्हा ते राजाला म्हणाले,

" श्रावणबाळा, तू बोलत का नाहीस ? रागावलास का रे आमच्यावर ? आम्ही तुला खूप त्रास देतो का रे ? तू बोलेपर्यंत आम्ही पाणीच पिणार नाही."

शेवटी दशरथाने घडलेले सारे काही सांगितले. तो म्हणाला,

"मला क्षमा करा. मलाच तुमचा श्रावण समजा. मी तुम्हाला काशीपर्यंत नेईन. माझ्या राजवाड्यात ठेवीन."

तेव्हा ते म्हणाले,

"आम्हाला काही नको, आम्हाला आमचा श्रावणबाळ हवा. राजा, तसुद्धा आमच्यासारखा पुत्र-वियोगाने मरशील."

- असे म्हणत त्या दु:खी मातापित्यांनी प्राण सोडला.

## शब्दार्थ

**आज्ञेत राहणे** सांगितलेले ऐकणे **कावड** वस्तू किंवा माणसे वाहून नेण्यासाठी असलेले दोन पारड्यांचे साधन **द्रोण** पळसाच्या पानांचा केलेला वाटीसारखा आकार **पुत्र-वियोग** पुत्रापासून वेगळे होणे

## स्वाध्याय

### १. खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे द्या :

(१) श्रावण कुणाची सेवा करीत होता ?

(२) श्रावणाच्या आई-वडिलांना कुठे जाण्याची इच्छा झाली ?

(३) श्रावणाला बाण कुणी मारला होता ?

### २. खालील प्रश्नांची तीन-चार वाक्यांत उत्तरे द्या :

(१) श्रावण बाळ कसा होता ?

(२) श्रावणाने आई-वडिलांना काशीयात्रेला कसे नेले ?

(३) राजा दशरथाने श्रावणाला बाण का मारला ?

(४) राजा दशरथाने श्रावणाच्या आई-वडिलांची क्षमा का मागितली ?

(५) श्रावणाचे आई-वडील राजा दशरथास काय म्हणाले ?

### ३. खालील विधाने कोण-कोणास म्हणाले ते लिहा :

(१) "बाळ मला क्षमा कर." ______________________

(२) "माझे आई-वडील तहानलेले आहेत."

(३) "मला क्षमा करा, मलाच तुमचा श्रावण समजा." ______

## ४. खालील वाक्ये वाचा आणि लिहा :

(१) तो त्यांची सेवा करी नि त्यांच्या आज्ञेत राहत असे.

______

(२) श्रावणाने झाडाच्या पानांचा द्रोण केला.

______

(३) श्रावण "आईऽऽग !" असे जोरात ओरडून खाली पडला.

______

(४) " श्रावण बाळा, तू बोलत का नाहीस ?"

______

## ५. खाली वाक्यांमध्ये बरोबर वाक्यासमोर ☑ आणि चुकीच्या वाक्यासमोर ☒ करा :

(१) श्रावण आई-वडिलांची सेवा करीत असे. ☐

(२) श्रावणाला बाण राजा हरिश्चंद्राने मारला. ☐

(३) श्रावण काशीला जायला निघाला. ☐

(४) राजा दशरथाने आवाजाच्या दिशेने बाण सोडला तेंव्हा उजेड होता. ☐

## ६. सूचनेनुसार करा :

(१) पाठात येणाऱ्या नवीन शब्दांची नोंद करा.

**उदाहरण :** कावड

(२) खालील शब्दांचे समानार्थी व विरूद्धार्थी शब्द लिहा :

| | शब्द | समानार्थी शब्द | विरूद्धार्थी शब्द |
|---|---|---|---|
| उदाहरण : | अंधार | काळोख | उजेड |
| | राजा | ______ | ______ |
| | खूप | ______ | ______ |
| | चांगला | ______ | ______ |
| | दिवस | ______ | ______ |
| | आनंद | ______ | ______ |
| | हळू | ______ | ______ |
| | वियोग | ______ | ______ |

## ७. खालील रिकाम्या जागा भरा :

(१) श्रावणाशिवाय त्याच्या आई-वडिलांना ______ पडत नसे.

(२) मला वाटले एखादे ______ पाणी प्यायला आले असावे.

(३) आम्हाला आमचा ______ हवा.

(४) राजा, तू सुद्धा आमच्यासारखा ______ मरशील.

**प्रवृत्ती**

- कोणत्याही एका धार्मिक स्थळाची मुलाखत घेऊन तेथे असलेल्या वस्तूंची नोंद करा आणि त्याचा उपयोग लिहा.


# १३ राणी लक्ष्मीबाई

– शं. रा. देवळे



झाशीच्या दरबारात एक सौदागर आला होता. त्याने दोन घोडे विक्रीसाठी आणले होते. ते दोन्ही घोडे अत्यंत उमदे आणि हुबेहूब सारखे होते. रंग, आकार, उंची, जाडी आणि ऐट या सर्व बाबतींत ते अगदी समान होते. सौदागर म्हणाला, ''या घोड्यांची परीक्षा करून किंमत ठरवावी !''

महाराणी लक्ष्मीबाईने ते काम स्वत:कडे घेतले. तिने त्या दोन्ही घोड्यांवर बसून फेरफटका मारला आणि सांगितले ''या दोन घोड्यांपैकी फक्त एकच घोडा कामाचा आहे ! दुसऱ्या घोड्याची छाती फुटलेली आहे. तो घोडा लांब पल्ल्याच्या मजलीसाठी निरुपयोगी आहे !''



हा एकच घोडा तेवढा चांगला !

राणीची ती अश्वपरीक्षा पाहून सौदागर थक्क झाला. सर्वच लोकांना नवल वाटले. राणीने त्या निरुपयोगी घोड्याची किंमत फक्त पन्नास रुपये ठरविली आणि कामाच्या घोड्याची एक हजार रुपये किंमत केली.

उभयपक्षी तीच किंमत मान्य करून तो सौदा पटविण्यात आला. कारण त्या काळात राणी लक्ष्मीबाई इतका श्रेष्ठ अश्वपरीक्षक हिंदुस्थानात इतर कोणी नव्हता.

पेशव्यांचे आश्रित मोरोपंत तांबे यांची छोटी कन्या मनू ही झाशीचे राजे गंगाधरराव यांची राणी झाली. तिचे भाग्य उजळून निघाले. पण त्या राणी लक्ष्मीबाईचा दत्तक वारस नामंजूर करून इंग्रजांनी झाशीचे राज्य खालसा केले.

त्या वेळी लक्ष्मीबाईचा स्वाभिमान दुखावला. ती म्हणाली, ''वाटेल ते होवो माझी झाशी मी इंग्रजांना देणार नाही.'' इंग्रजांनी झाशीला वेढा घातला. पण राणीने मोठ्या शिताफीने पुरुषवेष करून, पुत्र पाठीशी बांधून किल्ल्याच्या तटावरून घोडा फेकला आणि ती इंग्रजांच्या हातून झाशीतून निसटून गेली. प्रत्यक्ष शत्रूंनीही तिच्या पराक्रमाची तारीफ केली ! राणी लक्ष्मीबाई म्हणजे भारतीय नारींचे एक स्फूर्तिस्थान आहे.

## शब्दार्थ

**सौदागर** सौदा करणारा, व्यापारी **विक्री** विकणे **पल्ला** अंतर **अश्व** घोडा **उभयपक्षी** दोघांच्या बाजूने **थक्क होणे** आश्चर्यचकित होणे **दत्तक** दुसऱ्याचं मुल कायद्याने आपले मूल म्हणून स्वीकारणे **राज्य खालसा करणे** राज्याची मान्यता अमान्य करणे **नवल** आश्चर्य **तारीफ** स्तुती, प्रशंसा **स्फूर्ती** प्रेरणा **वेढा घालणे** चारीबाजूंनी घेरणे

## स्वाध्याय

### १. खालील दिलेल्या प्रश्नांची उत्तरे लिहा :

(१) झाशीच्या दरबारात सौदागराने आणलेले घोडे कसे होते ?

(२) राणीने दोन्ही घोड्यांची परीक्षा घेऊन काय सांगितले ?

(३) त्याकाळात हिंदुस्थानात अत्यंत श्रेष्ठ अश्वपरीक्षक कोण होतं ?

(४) इंग्रजांनी झाशीचे राज्य का खालसा केले ?

(५) इंग्रजांच्या हातून राणी लक्ष्मीबाई कशी निसटली ?

## २. रिकाम्या जागा भरा :

(१) झाशीच्या दरबारात एक ______________ आला.

(२) ______________ चे आश्रित मोरोपंत तांबे होते.

(३) इंग्रजांनी झाशीचे राज्य ______________ केले.

(४) राणी लक्ष्मीबाई म्हणजे ______________ ______________ एक स्फूर्तीस्थान आहे.

## ३. खाली दिलेल्या शब्दसमूहासाठी एक शब्द लिहा :

(१) घोड्यांची परीक्षा करणारा ______________

(२) मंजूर न करणे ______________

(३) एकसारखे दिसणारे ______________

(४) उपयोगी नसलेले ______________

## ४. खाली दिलेल्या शब्दांचे विरूद्धार्थी शब्द लिहा :

**उदाहरण :** विषम × समान

(१) कनिष्ठ × ______________ (२) उपयोगी × ______________

(३) मंजूर × ______________ (४) निंदा × ______________

(५) अमान्य × ______________ (६) मित्र × ______________

## ५. उदाहरणानुसार लिहा :

**उदाहरण :** एक घोडा – अनेक घोडे

(१) एक मूल – अनेक ______________

(२) एक गाय – अनेक ______________

(३) एक ______________ – अनेक कुत्रे

(४) एक म्हैस - अनेक ______

(५) एक रूपया - अनेक ______

(६) एक ______ - अनेक टरबूज

(७) एक शिकारी - अनेक ______

(८) एक मासा - अनेक ______

**६. खाली दिलेल्या वाक्यांना धड्यातील क्रमानुसार लावून परत लिहा :**

(१) राणी लक्ष्मीबाई झाशीतून निसटली.

(२) राणी लक्ष्मीबाई श्रेष्ठ अश्वपरीक्षक होती.

(३) राणी लक्ष्मीबाईने उपयोगी घोड्याची किंमत एक हजार रुपये ठरवली.

(४) राणी लक्ष्मीबाईचे लग्न झाशीच्या गंगाधररावराजे यांच्याशी झाले होते.

(५) इंग्रजांनी झाशीचे राज्य खालसा केले.

(१) ______

(२) ______

(३) ______

(४) ______


(५) ______

**७. खाली दिलेले प्राण्यांचे चित्र पाहून त्यांच्या विषयी तीन वाक्ये लिहा :**

(१) हत्ती ______

______


______



(२) गाय



(३) उंट



**प्रवृत्ती**

- घोडा या प्राण्याविषयी पाच वाक्ये लिहा.
- झाशीच्या राणीविषयी अधिक माहिती मिळवून सुमारे पाच वाक्ये लिहा.

# १४ उखाणे

– संकलित



१. पायात ठोकला उलटा खिळा
दोरात बांधला पाय अन् गळा



२. फुलाफुलांतून दलादलातून
प्रत्येक क्षण वेचित मधुकण
आम्ही वनवन करितो वणवण
सहकाराने श्रम विभाजन

३. हिरवी हिरवी पाने आली
वाटून वाटून केली ओली
पटकन् जादू तेंव्हा झाली
हातांवर ही लाली चढली





४. सरसर झाडावर, झरझर खाली
घरांच्या कौलांवर कौलांवरून अंगणात
शेंगांचा फराळ आवडतो ना !
वा रे तुमची बैठक ! आणि शेपटीची ऐट !

## शब्दार्थ

**श्रम** कष्ट, मेहनत **विभाजन** वाटणी **दल** पाकळी

## स्वाध्याय

**१. खालील प्रश्नांची उत्तरे लिहा :**

(१) कोणाच्या पायात खिळा ठोकलेला असतो ?

(२) फुलाफुलातून मधाचे कण कोण गोळा करते ?

(३) हातांवर लाली कशी चढते ?

(४) शेंगांचा फराळ कोणाला आवडतो ?

**२. अशाप्रकारे आणखी काही उखाणे मिळवा आणि लिहा :**

**३.** • सरसर – खार सरसर झाडावर चढते.

वरील प्रमाणेच पुढील शब्द घेऊन वाक्ये तयार करा.

झरझर, चटचट, खळखळ, चमचम, गरगर

• खसकन् – मधुने खसकन् माझे पुस्तक खेचले.

वरील प्रमाणेच पुढील शब्दही विशेष अर्थानेच वापरले जातात. त्यांचा योग्यप्रकारे वाक्यांत उपयोग करा आणि रिकाम्या जागी ते शब्द लिहा.

(पटकन्, धाडकन्, फसकन्, सरकन्, फाडकन्)

(१) त्या मुलीने ________ वाकून मला नमस्कार केला.

(२) तुषार जिना चढताना ________ खाली पडला.

(३) त्या गुंडाने रस्त्यात एका माणसाला ________ गालावर मारले.

(४) एका बाई चालता-चालता पडली तेव्हा मला ________ हसू आले.

(५) माझ्या गळ्यातली माळ तुटली आणि ________ सर्व मोती ओघळले.

४. खालील चित्र पहा आणि पाच वाक्यांत त्याचे वर्णन करा :



**प्रवृत्ती**

- या पाठातील उखाण्यांच्या आधारे पुढील विषयांवर दोन-दोन वाक्ये लिहा.
  (१) भवरा (२)खार (३) मधमाशी

# पुनरावर्तन ४

**१. खालील प्रश्नांची उत्तरे लिहा :**

(१) मुले कशाप्रकारे पतंग उडवीत आहेत ?

(२) श्रावणाला बाण कुणी मारला ?

(३) इंग्रजांनी झाशीचे राज्य का खालसा केले ?

(४) कोणताही एक उखाणा लिहा.

**२. खालील शब्दांचे समानार्थी शब्द लिहा :**

(१) घोडा = ______ (२) मासा = ______

(३) शत्रू = ______ (४) विवाह = ______

(५) मित्र = ______ (६) फूल = ______

**३. उदाहरणाप्रमाणे करा :**

**उदाहरण :** वळतीमा – मावळती

(१) गरमळाडों ______ (२) वीहिर ______

(३) जग्रइं ______ (४) ळफरा ______

**४. काव्यपंक्ती पूर्ण करा :**

रंग ढगांवर ______

______

______

______ बाजुस डोंगरमळा.

५. खालीलपैकी कोणत्याही दोघांविषयी लिहा :

(१) कॉम्प्यूटर (२) आई (३) पतंग (४) शाळा

(१) ______

(२) ______

(३) ______

(४) ______

## पूरक वाचन

# १ प्रकाशांतले तारे तुम्ही

– उमाकांत काणेकर

प्रकाशांतले तारे तुम्हीं, अंधारावर रुसा
हंसा, मुलांनों हंसा ॥ धृ. ॥

तुम्हां बोलवी ती फुलराणी
खेळ खेळती वारा पाणी
आनंदाच्या शिखरावरती, खुशाल जाउन बसा ॥ १ ॥

रडणें हा ना धर्म आपुला
हंसण्यासाठी जन्म घेतला
भारतभूच्या आदर्शाचा, मनीं उमटुं दे ठसा ॥ २ ॥

सर्व मागचा विसरा गुंता
अरे उद्यांच्या नकोत चिंता
बघा, अरुण तो बाळांनो रे, तुम्हां खुणवितो कसा ॥ ३ ॥

### शब्दार्थ

**अरुण** पहाटेचा सूर्य

❋

# २ भवाई

– पंढरीनाथ रेगे

गुजरातेतील ' भवाई ' हे लोकनृत्य सुप्रसिद्ध आहे. खरं तर आपल्या पद्धतीनं नृत्य–नाट्य–कथाकथन करणारे हे भवाई संघ असतात. प्रत्येक संघात नऊपेक्षा कमी व विसांहून जास्त माणसं असता कामा नयेत, असा दंडक आहे.



ही भवाई मंडळं गावोगाव खेळ करीत हिंडतात. ज्या गावात ते जातील त्या गावात त्या मंडळाच्या खर्चासाठी घरटी पंचवीस ते पन्नास पैसे वर्गणी गोळा केली जाते. शिवाय गावात त्यांचे खेळ चालतात तोवर मंडळीतील सर्वांना गावकरी आळीपाळीनं जेवण देतात. गूळ–तूपही देण्यात येतं. रात्री खेळांच्या वेळी मशालींसाठी तेल लागतं. ते सधन माणसं देतात.

खेळांची व्यवस्था पाहण्याचं काम भवाई नर्तकांच्या स्त्रीयांचं. खेळ चालू असताना मात्र या व्यवस्थापक स्त्रीया कटाक्षानं पडद्याआड राहतात.

ज्या रात्री नृत्य व्हायचं असतं, त्या दिवशी दुपारच्या वेळी भवाई मंडळी गावातल्या लोकांना कथा सांगतात.

भवाई नृत्य–नाट्याची रंगभूमी काही वेगळीच असते. एखादं मोकळं मैदान, देवळाचं पटांगण अशी उघडी जागा निवडतात. तिथं वीस फूट व्यासाचं वर्तुळ काढतात. मग या वर्तुळातील जमीन विटकरीच्या तुकड्यानं साफ करतात. हीच ती रंगभूमी. ही पवित्र मानली जाते. तिथं एक दिवा

लावल्यावर प्रत्यक्ष खेळ सुरू होतो. तर हा दिवा, खेळ पूर्णपणे संपेपर्यंत दुसऱ्या दिवसापर्यंत तेवत ठेवला जातो. खेळातील पात्रं रंगभूषेला बसण्याआधी दोन प्रार्थनागीतं गातात.

नृत्य सुरू होण्याआधी देवीची स्तुती करणारी गाणी गातात. मग दोघेजण पडद्यासारखं कापड घेऊन रंगभूमीवर उभे राहतात. लगेच गणपती, हातात धरलेल्या पितळी थाळीआड आपलं तोंड लपवीत, तालात पावलं टाकीत येतो. प्रेक्षकांसमोर येताच तो तोंडावरची थाळी बाजूला सारतो. गणपतीचं माफक नृत्य झाल्यावर तो पडद्यामागं जातो आणि मग मुख्य खेळ सुरू होतो.

प्रत्येक खेळात नायक, नायिका व विदूषक ही तीनच पात्रं असतात. स्त्री-वेषातला नट नाचताना एरंडीच्या तेलातले लहान-मोठे पेटते काकडे आपल्या तोंडासमोरून कौशल्यानं फिरवतात.

भवाईतली गीतं उंच स्वरात गातात. संवादांतले शब्द स्वच्छपणे उच्चारले जातात. संगीत रागदारी असतं. संवाद बहुधा संगीतमय असतात. गद्य संवाद असतील तेव्हा ते तालासुरावर म्हटले जातात.

भवाई नृत्य-नाट्याला 'वेश' म्हणतात. हे परंपरेनं चालत आलेले आहेत. असे जवळजवळ ३६० वेश उपलब्ध आहेत; पण बहुतेक सारे वेश मौखिक स्वरूपात आहेत. फारच थोडे ग्रंथाच्या स्वरूपात आहेत. बाकीचे पाठांतरानं पिढ्यान्-पिढ्या चालत आलेले आहेत.

भवाई मंडळीतील बहुतेक कलावंत पिढ्यान्‌पिढ्या एकेका कुटुंबातून तयार होत आलेले आहेत. जीवनातल्या नेहमीच्या पण गैर घटनांवर उपरोधिक टीका करून लोकांचे डोळे उघडणं, हा या वेशांचा उद्देश असतो.

लोकांना लुबाडणारे व्यापारी, गावगुंडांची अरेरावी दाखवणारे प्रसंग वेशात असतात. 'शंकरिया' या नावाजलेल्या प्रयोगात मात्र एक गारुडी व जोगीण यांच्या प्रेमकथेला स्थान दिलेलं आहे.

या प्रयोगांखेरीज मडक्यांची उतरंड डोईवर रचून केलेला नाच, तलवारीचा नाच, पेटत्या बाटल्यांचा नाच, अशी आकर्षक नृत्यंही होत असतात.

पावसाळ्याचे चार महिने गावोगाव फिरून भवाई मंडळ्या खेळ करून दाखवतात. इतर आठ महिने ही मंडळी घरची शेतीभाती वगैरे धंदे करण्यात गुंतलेली असते.

## शब्दार्थ

**भवाई** गुजरातमधील सुप्रसिद्ध लोकनृत्य **दंडक** मान्यता, नियम **मशाल** रात्रीच्या वेळी प्रकाशासाठी तेल घालून वापरण्यात येणारे साधन **कटाक्ष** आवर्जून **काकडे** कापडातून बनविलेली जाड दोरी

*


# ३ ऋतू

– संकलित

**पाठपरिचय :** वसंत, ग्रीष्म, वर्षा, शरद, हेमंत, शिशिर या ऋतूंमध्ये निसर्गात होणारे विविध बदल, त्याचा मानवी जीवनावर, पशुपक्ष्यांवर होणारा परिणाम, ऋतूनुसार बदलणारे हवामान आणि निसर्ग यांचे सुंदर वर्णन या कवितेत आले आहे.

झुळझुळ वारे वाहु लागले,
लाल पालवी तरूंवरी.
फुलाफुलांनी लवल्या वेली,
आंबेराई मोहरली.
आभाळाचे निळेनिळेपण,
कुहू कुहू कोकीळ करी.
वसंत आला घरोघरी !






ग्रीष्म पातला, सूर्य तापला,
ऊन कडक जिकडे तिकडे.
खूप तापते जमीन, तिजवर
जागोजागी पडती तडे.
गरम झळांच्या ऐन दुपारी
छाया शोधिती गुरे, पाखरे
उन्हांत खेळू नका बरे !

वारे सुटले, मेघ उसळले,
गडगडती ते आभाळी !
वीज कडकडे लखलख करूनी,
सर सर सर वर्षा आली.
सुटे मातीचा वास चहुंकडे,
कागद-होड्या सोडायाची
पावसात किती मौज असे !





शरद येई, अन् मेघ पळाले
गुबगुबीत जणु पळति ससे !
कुरणे हिरवीगार चहुंकडे,
हिरवे हिरवे मळे तसे.
हिरवी झाडे, हिरवी शेते,
तुडुंब भरले तळे निळे.
चांदण्यात वाटे बागडावे



हेमंताचे दिवस पातले,
भरे हुडहुडी अंगात.
शेतकऱ्याची गोफण फिरते
गरगर भरल्या शेतात.
हवेहवेसे ऊन वाटते,
शेकोटीच्या भवती रात्री
गप्पांना भरती येते !



उदासवाणा शिशिर ऋतू ये,
पाने पिवळी पडती.
सोसाट्याच्या वाऱ्यासंगे
झर झर झर झर गळती.
झडून पाने झाडे सगळी
केविलवाणी दिसतात.
पाचोळा उडतो वाऱ्यात !

सहा ऋतूंचे चाक फिरतसे,
शिशिर ऋतूही जाईल तेव्हा
वसंत सांगे हळूच 'मीही
येतो मागोमाग पाहा !'

## शब्दार्थ

**लवणे** खाली वाकणे **पालवी** झाडाची कोवळी पाने **मोहरणे** बहर येणे, फुलणे **पातला** आला **केविलवाणी** गरिबासारखी **तुडुंब** काठोकाठ भरलेला **पाचोळा** वनस्पतींची झाडावरून खाली पडलेली वाळलेली पाने.

✳